



103



SNDT W.U. Library, Churchgate
M923 754 158449
Kar/Des
M923·754
Kar/Des
158449

स्त्री शिक्षणाचे प्रणेते

# महर्षी कर्वे

सौ. मालती देशपांडे

12/12/07
[V], 72 P.
Rs. 25/-

# स्त्री शिक्षणाचे प्रणेते - महर्षी कर्वे

सौ. मालती देशपांडे

923.754
Kar/Des

158449
SNDT W.U. Library, Churchgate
M923.754 158449
Kar/Des

महर्षी कर्वे स्त्री - शिक्ष
कर्वेनगर, पुणे ४११ ०

शतक महोत्सव प्रकाशन

१९९७

**स्त्री शिक्षणाचे प्रणेते - महर्षी कर्वे**

❑

**लेखिका :**
सौ. मालती देशपांडे

❑

**प्रकाशक :**
महर्षी कर्वे स्त्री - शिक्षण संस्था
कर्वेनगर, पुणे ५२

❑

**मुखपृष्ठ व आतील चित्रे :**
श्री. सुधाकर खाजगीवाले

❑

**मुद्रक :** दि प्रिमिअर को-ऑप. प्रिंटर्स लि.
महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय
''आर्यभूषण भवन'', शिवाजीनगर पुणे ४.

❑

**किंमत :** २५ रु.

# शुभचिंतन

''शिक्षणामुळे स्त्री स्वतंत्र व कर्तव्यदक्ष बनेल. आशा-आकांक्षांचे अमर्याद क्षेत्र स्त्रियांना शिक्षणामुळे मोकळे होईल. शिक्षणामुळे ती अधिक समर्थ बनेल.''

हा केवळ आशावाद नव्हता की आशीर्वाद नव्हता. हा ध्यास होता या भूमीच्या एका महर्षींचा. नव्हे, तो त्यांचा श्वास बनला होता.

शतायुषी जीवन लाभलेल्या या महर्षींने-अण्णांनी माणसाने माणूस म्हणून कसे जगावे याचा एक उत्तुंग आदर्शच समाजापुढे उभा केला. स्त्री शिक्षणाचा, स्त्री मुक्तीचा व स्त्रीशक्ती जागी करण्याचा वसा घेतलेल्या या थोर पुरुषाने प्रतिकूल सामाजिक वातावरण व मते यांची तमा न बाळगता, प्रसंगी त्यांच्याशी टक्कर देत आपले स्वप्न खरे करून दाखवले. प्रवास खडतर होता, ते डगमगले नाहीत. स्वतःच्या ध्येयावर अविचल श्रद्धा ठेवून चिवटपणे, कणखरपणे, पण तितक्याच हळुवारपणे माणसे जोडत जोडत काम कसे करावे याचे उत्तम मार्गदर्शन अण्णांच्या जीवनचरित्रातून व कार्यपद्धतीतून मिळते.

कोकणातल्या एका लहानशा खेड्यात जन्मलेल्या या बालकाने परिस्थितीशी झुंज घेत घेत आपले शिक्षण पूर्ण केले. त्या अनुभवातून इतरांच्या वाट्याला असे खडतर कष्ट येऊ नयेत म्हणून केवळ मुलींसाठीच नव्हे, तर सर्वांसाठीच शिक्षणाची दारे मोकळी व्हावीत म्हणून उत्तरायुष्यात अण्णांनी महाराष्ट्र-ग्राम-प्राथमिक-शिक्षण संघाची निर्मिती केली. अनाथाश्रम, स्त्रीशिक्षण, महिला विद्यापीठ इत्यादी क्षेत्रांच्या संबंधातील अण्णांचे कार्य सर्वदूर प्रसिद्ध असले तरी महाराष्ट्रातील खेड्यापाड्यांत सर्वांपर्यंत प्राथमिक शिक्षण तरी पोहोचावयास हवेच या दृष्टीने त्यांनी घातलेले लक्षही तितकेच महत्त्वाचे होते. त्यामुळे आजच्या अनेक सामाजिक सुधारणांची व शैक्षणिक कार्यक्रमांची मुळे इतकी खोलवर रुजलेली दिसतात.

कै. महर्षी कर्वे यांचे अवघे जीवन म्हणजे आव्हानांचा एक अखंड प्रवासच आहे. शंभराहून अधिक वर्षांच्या या प्रदीर्घ प्रवासाचे दर्शन सौ. मालतीबाई देशपांडे यांनी अगदी मोजक्या शब्दांत **'स्त्री शिक्षणाचे प्रणेते महर्षी कर्वे'** या पुस्तकात ते घडवले आहे. विकासाची वाट चालणाऱ्या मुलामुलींसाठीच हे पुस्तक लिहिलेले असल्याने त्यांनी मोजकेच प्रसंग निवडले आहेत. त्यांना अनुरूप शीर्षके दिली आहेत आणि मुलांना समजेल अशा सोप्या भाषेत मांडणी केली आहे. प्रसंगांची अचूक निवड, सुबोध शैली आणि ओघवती भाषा यामुळे पुस्तक आकाराने लहान असले तरी त्याची परिणामकारकता जाणवल्याशिवाय राहत नाही. पुस्तकाच्या अखेरीस लेखिकेने दिलेले महर्षींचे विचारधन पुस्तकाच्या एकूण गुणवत्तेत मोलाची भर घालते.

"मी अत्यंत सुखी आहे. मला शक्य होते ते सारे मी केले... इच्छा आहे तेथे मार्ग आहेच, जीवनाचे नवे नवे मार्ग मी शोधत गेलो. म्हणूनच मला माझ्या जीवनात आनंद लुटता आला." आपल्या अथक व कृतकृत्य जीवनयात्रेचे हे मर्म सांगणाऱ्या या भारतरत्नाचे हे छोटेसे जीवनचरित्र लिहून मालतीबाईंनी मराठी साहित्यात व त्यातही पुन्हा शिक्षण व संस्कार-विषयक साहित्यात वैशिष्ट्यपूर्ण भर घातली आहे.

या पुस्तकाच्या रूपाने मिळणारा सत्संग अनेक संस्कारबीजे संस्कारक्षम मनांमध्ये रुजण्यास निश्चितच उपयुक्त ठरेल, असा मला विश्वास वाटतो.

शिक्षणातून केवळ माहितीच नव्हे, तर योग्य ते संस्कार मुलांना मिळावेत या दृष्टीने लेखन होणे ही काळाची गरज आहे. लेखिका व प्रकाशक या दोघांचेही मनःपूर्वक अभिनंदन.

**वि. वि. चिपळूणकर**
माजी शिक्षण संचालक
महाराष्ट्र राज्य

# मनोगत

भारतरत्न महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी १८९६ साली स्थापन केलेल्या संस्थेला शंभर वर्षे पूर्ण झाली. १९९६ ह्या संस्थेच्या शतक-महोत्सवी वर्षात स्त्रियांच्या उद्धारासाठी सर्वस्व समर्पण करणाऱ्या संस्थेच्या संस्थापकांचे अण्णासाहेब कर्वे यांचे चरित्र प्रकाशित करण्याचे संस्थेने ठरविले. चरित्र लेखनाचे काम करण्याची संधी मला मिळाली ही माझ्या दृष्टीने महत्‌भाग्याची गोष्ट. माझे बऱ्याच दिवसांचे स्वप्न साकार झाले.

सुमारे पन्नास वर्षांपूर्वी १९४७-४८ साली संस्थेच्या वाईच्या कन्याशाळेत मी शिकत होते. त्यावेळी अण्णासाहेब कर्वे म्हणजे संस्थेतील फार मोठी व्यक्ती म्हणजे देवासारखीच आहे असे वाटायचे. १९५० साली शाळेच्या रौप्यमहोत्सवाचे वेळी अण्णा शाळेत आले होते. त्यावेळी त्यांना प्रथम पाहिले. ते ऋषिमुनींसारखे वाटले. त्यावेळी महर्षी, समाजसुधारक, युगपुरुष या शब्दांचे अर्थही समजत नव्हते.

अण्णांचे द्रष्टेपण समजले ते कॉलेज शिक्षणाचे वेळी. प्रपंच, नोकरी सांभाळून पदवीधर होऊ इच्छिणाऱ्या शेकडो महिलांना अण्णांनी स्थापन केलेल्या महिला विद्यापीठामुळे विकासाची दालने खुली झाली.त्यावेळी अण्णांच्याबद्दल अपार भक्तिभाव दाटून येई. पुढे याच संस्थेत सेवा करण्याची संधी मिळाली. अण्णांच्या आत्मचरित्राचा अभ्यास केला, भारावून गेल्यासारखे झाले. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू उलगडू लागले. अण्णा हेच आराध्यदैवत बनले. ध्यानी-मनी-स्वप्नी त्यांचाच आदर्श डोळ्यासमोर राहील.

परीक्षेसाठी १०८ मैलांचा प्रवास करणारे अण्णा, संस्थेसाठी वर्गणी जमा करण्यासाठी जगप्रवास करणारे अण्णा, समाजाचा प्रखर विरोध सहन करून स्त्रियांच्या उद्धारासाठी अहर्निश झटणारे अण्णा, अशी अण्णांची असंख्य रूपे डोळ्यासमोर येत. धर्म, परमेश्वर, जातिभेद या संबंधीचे त्यांचे विचार, त्यांचे कार्य पाहून वाटे खरंच अण्णा कोण होते? शिक्षक ? प्राध्यापक ? समाजसेवक ? समाज शिक्षक ? समाज सुधारक? का आधुनिक संत ? खरं तर अण्णा सर्व काही होते, याहीपेक्षा खूप काही होते. त्यांचे मोठेपण शब्दात मावणारे नव्हते. शब्दांच्या पलीकडचे होते.

जगद्विख्यात शास्त्रज्ञ आइनस्टाइन, शिक्षणतज्ज्ञ मादाम मॉंटेसरी यासारख्या अनेक पाश्र्चात्त्य विद्वानांनी ज्यांचा गौरव केला, महात्मा गांधी, राष्ट्रपती राजेंद्रप्रसाद, रवींद्रनाथ टागोर, पंडित जवाहरलाल नेहरू यांसारख्या असंख्य मान्यवरांनी ज्यांचा आदर केला ते महर्षी कर्वे आपल्या संस्थेचे संस्थापक आहेत याचा सार्थ अभिमान वाटतो. मात्र नुसता अभिमान बाळगून आपली जबाबदारी संपत नाही. अण्णांचे कार्य, त्यांचे विचारधन उद्याचे नागरिक असणारे विद्यार्थी, विद्यार्थिनी, त्यांना घडविणारे शिक्षक, यांच्यापर्यंत पोचावे, त्यातून त्यांना प्रेरणा मिळावी, अशी अपेक्षा आहे.

**स्त्री शिक्षणाचे प्रणेते -- महर्षी कर्वे** या पुस्तकाच्या माध्यमातून ही अपेक्षा पूर्ण होईल असे वाटते. अण्णांना १०५ वर्षांचे दीर्घायुष्य लाभले. त्यांचा जीवनपट विशाल आहे. त्याहीपेक्षा त्यांचे कार्य विराट आहे. या पुस्तकातून त्यांचे समग्र नव्हे तर संक्षिप्त जीवनदर्शन घडविण्याचा प्रयत्न केला आहे. ह्या पुस्तकासाठी लेखन करताना मी सर्वस्वी अण्णांच्या आत्मचरित्राचाच आधार घेतला आहे.

संस्थेच्या संचालक मंडळाने हे चरित्र लिहिण्याची संधी मला दिली. त्यांना मी मनापासून धन्यवाद देते. आम्हा शिक्षकांचे प्रेरणास्थान ठरलेले महाराष्ट्र राज्याचे माजी शिक्षण संचालक मा. श्री. वि. वि. चिपळूणकर यांनी या पुस्तकाला प्रस्तावना दिली. त्यामुळे माझा आनंद शतगुणित झाला. त्यांची मी ऋणी आहे. पुस्तकाचे बोलके मुखपृष्ठ आणि आतील देखणी चित्रे काढण्याचे काम श्री. सुधाकर खाजगीवाले यांनी अत्यंत आपुलकीने केले. त्यांची मी अंतःकरणपूर्वक आभारी आहे. या पुस्तकाच्या लेखनाचे वेळी ज्यांनी प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष सहकार्य केले, प्रोत्साहन दिले त्या सर्वांची मी ऋणी आहे. सौ. स्वाती राजपाठक यांनी मुद्रण प्रत बनवून देण्यासाठी जे सहकार्य केले, त्याबद्दल मनापासून कौतुक !

आता प्रतीक्षा आहे वाचकांच्या प्रतिसादाची !

**-- सौ. मालती देशपांडे**

४८, शिलाविहार कॉलनी,
पौड रोड, पुणे ४११ ०३८.

# कोकणचा सुपुत्र

कोकण म्हटले की नारळ, सुपारी, फणस, आंबे, कोकम अशा नानाविध फळांच्या संपत्तीने, निसर्ग सौंदर्याने नटलेली भूमी डोळ्यासमोर येते. अशी ही कोकणची भूमी, स्वदेशाभिमानी नेत्यांची जनकभूमी म्हणूनही ओळखली जाते. राजकारण, समाजकारण, शिक्षण अशा विविध क्षेत्रांत अग्रगण्य ठरलेल्या, लो. टिळक, गोपाळ कृष्ण गोखले, डॉ. भांडारकर, रँग्लर परांजपे, डॉ. आंबेडकर, साने गुरुजी अशा श्रेष्ठ नररत्नांची ही जन्मभूमी. कोकणात तक्षशिला, नालंदा यासारखी विद्यापीठे निर्माण झाली नाहीत. मात्र इथल्या विद्वानांच्या उत्तुंग कर्तृत्वाचा, असामान्य बुद्धिमत्तेचा, निरलस सेवावृत्तीचा प्रभाव संपूर्ण भारतावर पडला होता. अशा या कोकणचा सुपुत्र भारतरत्न धोंडो केशव कर्वे म्हणजेच अण्णासाहेब कर्वे होत.

पेशव्यांच्या काळात कोकणातले पुष्कळसे हिंमतवान व कर्तृत्ववान लोक आपल्या नशिबाची पारख करण्याकरिता पुण्यात येत असत. असेच पुण्यात आलेले केशवभट कर्वे हे धार्मिक, तेजस्वी अग्निहोत्री ब्राह्मण होते. त्यांचे धाकटे बंधू रघुनाथ भट हे अण्णांचे पणजे. रघुनाथ भट हे व्यवहारचतुर व हुशार गृहस्थ होते. या दोघा भावांनी मुरुड गावात धर्मादायाची अनेक कामे केली. त्यातली महत्त्वाची दोन कामे म्हणजे गावातील तलाव आणि दुर्गामातेचे मंदिर.

या दोघांच्या औदार्याने, धार्मिक वृत्तीने मुरुड ग्रामस्थांवर त्यांचे चांगलेच वजन होते. कर्वे कुटुंबांना गावात अष्टमानकऱ्यांपैकी एक असाही मान मिळाला. हरिहरेश्वर हे कर्वे कुटुंबियांचे कुलदैवत. जोगेश्वरी

ही कुलस्वामिनी. मुरुड गावात आणि पुण्यातही कर्वे कुटुंबांची बरीच इस्टेट होती, वाडे होते. सांपत्तिक स्थितीही चांगली होती. रघुनाथ भटजींचे कनिष्ठ चिरंजीव बापूनाना हे अण्णांचे आजोबा. ते स्वभावाने गोड होते. पण त्यांनी काहीही कर्तबगारी न करता पूर्वीच्या वैभवावर दिवस काढले. हळूहळू हे वैभव कमी होत गेले. बापूनानांचे मधले चिरंजीव केशवपंत हे अण्णांचे वडील. त्यांना मात्र उपभोग घेण्यासाठी इस्टेटच शिल्लक नव्हती. उलट कौटुंबिक कर्जाचे ओझेच त्यांना पेलावे लागले. पण अण्णांच्या आई-वडिलांनी त्या प्रतिकूल परिस्थितीतून प्रपंचाचा गाडा धैर्याने, नेटाने चालविला.

## उद्योगी पिता - स्वाभिमानी माता

अण्णांची आई लक्ष्मीबाई आणि वडील केसोपंत म्हणजेच केशवपंत.

अण्णांचे वडील हे शांत, उद्योगी, सुसंस्कृत गृहस्थ होते. त्यांचा स्वभाव निग्रही, समंजस होता. सकाळी उठल्यापासून ते रात्री झोपेपर्यंत ते सतत कामातच मग्न असायचे. काथ्याचा पिळवा पिळून त्याचा सुंभा तयार करायचे, गुरांची दावी, रहाटाच्या माळा वळणे यात ते वाकबगार होते. ते पत्रावळी लावीत. लोकांची पागोटी बांधीत. ते सुंदर चित्रेही काढीत. रामविजय, हरिविजय, पांडवप्रताप या पोथ्या ते वाचीत व इतरांनाही ते वाचून दाखवीत. पहाटे उठून भूपाळ्या म्हणत. गोड बोलणे, कोणतेही काम मनापासून व काटकसरीने करणे हे त्यांचे स्वभाववैशिष्ट्य होते. लग्नाचे वेळी अण्णांचे वडील केशवपंत १२ वर्षांचे व आई ७ वर्षांची होती. लहानपणी चौसोपी वाड्यात ते राहात होते. हातात सोन्याची कडी घातली होती. असे कर्वे कुटुंबियांचे पूर्वीचे वैभव होते पण पुढे ते राहिले नाही. त्यामुळे अण्णांच्या आई-वडिलांना अत्यंत हालअपेष्टांना तोंड द्यावे लागले. काही झाले तरी कर्ज काढायचे नाही असा निश्चय त्यांनी केला होता. तो तडीसही नेला. त्यांनी आपली गरिबी



लोकांपुढे कधीही उघड केली नाही. अण्णांचे आई-वडील दोघेही कष्टाळू होते. त्या दोघांनीही तुटपुंज्या मिळकतीत काटकसरीने व परोपकारी वृत्तीने प्रपंच केला. ते स्वाभिमानी व धार्मिक वृत्तीचे होते. कर्वे कुलाचा त्यांना विशेष अभिमान होता. अण्णांची आई साध्वी, विनयी, मानी स्वभावाची होती. अशा सात्त्विक माता-पित्यांच्या पोटी अण्णांचा जन्म झाला.

## बालपणाचा काळ सुखाचा

दक्षिण कोकणात रत्नागिरी जिल्ह्यात दापोली तालुक्यात मुरुड हे अण्णांचे गांव. मुरुडपासून १५ मैलांवर असलेले शेरवली हे गांव. या गावातील परांजपे घराण्यात अण्णांचे आजोळ होते. इथेच वैशाख शुद्ध ५ शके १७८० म्हणजे १८ एप्रिल १८५८ या दिवशी अण्णांचा जन्म झाला. आधीची तीन अपत्ये अल्प वयातच देवाघरी गेली होती. त्यामुळे घरच्या लोकांनी अण्णांच्या मोठ्या भावाचे नाव भिकू असे ठेवले होते. अण्णांचे नाव ठेवले धोंडू. दगडू, धोंडू, भिकू अशी नावे ठेवली म्हणजे मुलांना दृष्ट लागत नाही ती दीर्घायुषी होतात अशी पूर्वीच्या लोकांची समजूत होती. अण्णांच्या बाबतीत योगायोगाने ती खरी ठरली. समजायला लागल्यापासून अण्णा मुरुड येथेच लहानाचे मोठे झाले. मुरुड हे गाव त्या वेळी सुसंस्कृत, सुखवस्तू, पुढारलेले गाव म्हणून ओळखले जायचे. उत्तम हवेचे ठिकाण म्हणून ते प्रसिद्ध तर होतेच शिवाय समुद्रकाठी वसलेल्या या निसर्गरम्य गावाची आखणी फार नमुनेदार होती. वेदविद्येसंबंधीही त्यावेळी या गावाची प्रसिद्धी होती. अशा या गावात अण्णांचे बालपणीचे दिवस मजेत गेले.

लहानपणापासून अण्णांची वाणी खणखणीत, स्पष्ट व शुद्ध होती. त्यांचा गळा गोड होता. भूपाळ्या, देवाची स्तोत्रे ते सुरावर म्हणत असत. लग्न-मुंजीचे जेवण असले की पंगतीत श्लोक म्हणण्याचा मान अण्णांना मिळायचा. रामविजय, हरिविजय रोज रात्री म्हणण्याचा त्यांचा परिपाठ

होता. शिवलीलामृताचे पारायण, गुरूचरित्राचा सप्ताह करणे यात ते लहापणीच प्रवीण झाले होते. त्या काळच्या पद्धतीप्रमाणे मुंज होताच अण्णांनी वैश्वदेव, पुरुषसूक्त, सौर, रुद्र, पवनमानाचा काही भाग शिकून घेतला.

अण्णांना खेळाचाही नाद होता. गड्डे, सूरपारंब्या, आट्यापाट्या हे त्यांचे आवडीचे खेळ होते. त्यांना झाडावर चढायला आवडायचे. वड, भूखडा, चांदडा, फणस या झाडांवर चढून पत्रावळीसाठी पाने काढायची व त्याच्या पत्रावळी लावायच्या हा त्यांचा आवडता उद्योग. सुंदर आकाशकंदील करायचे, छत्र्यांचे अभ्रे शिवायचे ही कामेही ते आवडीने करायचे. चातीवर कापूस कातून त्याचे सूत बनविणे हाही त्यांचा आवडता छंद होता. मुरुडला किंवा आसपासच्या गावात कीर्तन, नाटक असले की ते आवर्जून तिकडे जायचे. मुरुडला अण्णा आणि त्यांची मित्रमंडळी नाटकांचे प्रयोग करीत. एकदा अण्णांनी या नाटकात गणपतीची तर एकदा राधेची भूमिका केली होती. मात्र ही राधा पडद्यामागून बोलायची. ''वेणीसंहार'' या संस्कृत नाटकातील प्रवेशात त्यांनी अश्वत्थाम्याचे काम केले होते.

अण्णांचा रंग सावळा होता. त्यांची बुटकी, कृश असणारी मूर्ती पाहून लोकांना वाटे त्यांची वाढ नीट झाली नसावी पण प्रत्यक्षात त्यांना कोणताही आजार नव्हता. त्यांची अंगकाठीच तशी होती. नियमित व्यायाम, खेळ यामुळे त्यांची शरीर प्रकृती काटक बनली होती. अण्णांचा स्वभाव भित्रा, लाजाळू, अबोल असल्याने तिऱ्हाईत माणसांशी बोलण्याचा प्रसंग आला की ते घाबरत असत. मात्र सर्वसामान्य मुलांप्रमाणे त्या त्या मोसमात कैऱ्या पाडणे, शिमग्याच्या वेळी लाकडे, गोवऱ्या, गवत, नारळ वगैरे पळविणे हे सारे त्यांनी लहानपणी केले होते. मित्रांच्या एखाद्या गटाचे पुढारी मात्र ते कधीच झाले नाहीत. धाडसीपणाने, दांडगेपणाने वागण्याचा त्यांचा स्वभाव नव्हता.



## आठवणी

लहानपणी अण्णांचा स्वभाव हट्टी होता. एकदा सकाळच्या जेवणाच्या वेळी त्यांनी आईजवळ हट्ट धरला ''मला आत्ताच्या आत्ता कडवे वाल करून घाल'' हा पदार्थ काही झटपट होणारा नव्हता. तरीही त्यांच्या आईने फोडणीच्या पळीत दहावीस वालाचे दाणे भाजल्यासारखे, शिजविल्यासारखे करून अण्णांच्या पानात वाढले. हिरवे कच्चे दाणे त्यांनी चवीने खाल्ले, तेव्हा कुठे त्यांचे समाधान झाले.

नुकतीच अण्णांची मुंज झाली होती. एकदा मंडलिक यांच्या घरी धार्मिक कार्यक्रम होता. त्या वेळी चार आणे दक्षिणा मिळत होती. त्या वेळी अण्णा आपल्या बहिणीलाही बरोबर घेऊन गेले. अण्णांना चार आणे व बहिणीला एक आणा दक्षिणा मिळाली. बहिणीने ती दक्षिणा मुठीत गच्च पकडून ठेवली होती. अण्णा तिला म्हणाले, ''ते पैसे माझ्याजवळ दे.'' ती काही पैसे देईना. अण्णांना वाटत होते तिचे व आपले सगळे पैसे आपण आईला देऊया. पण बहीण त्यांच्याबरोबर आलीच नाही त्यामुळे मोठेपणा मिरविण्याचा मान त्यांना काही मिळाला नाही.

अण्णांच्या सर्व मित्रांना चांगले पोहोता येत होते. अण्णांना मात्र पाण्याची फार भिती वाटायची. त्या दिवशी रविवार होता. दुपारची जेवणे झाल्यावर शेजारच्या मंडळींनी अण्णांना बेसावधपणे पकडले आणि जबरदस्तीने त्यांच्या कमरेला एक सुखड (झाडावरच वाळलेला नारळ) बांधून त्यांना विहिरीत फेकून दिले. अण्णा खूप घाबरले. ओरडू लागले. वेडेवाकडे हात मारू लागले. शेवटी तर गटांगळ्या खाऊ लागले. तेव्हा कुठे लोकांनी त्यांना वर काढले. सगळ्यांनी त्यांची चेष्टा केली. त्यानंतर कधी पोहोण्याचे नाव काढले की, अण्णांच्या उरात धडकीच भरायची. अशीच एकदा शेजारची मंडळी पोहायला निघाली हे समजल्यावर अण्णा भीतीने अंधाऱ्या माळ्यावर लपून बसले. बराच वेळ झाला, तरी अण्णा

घरी आले नाहीत त्यामुळे घरची मंडळी घाबरली. अण्णा विहिरीत पडले की काय अशी शंका आली. सर्वत्र शोधाशोध सुरू झाली. पोहोणारी मंडळी घरी परत आली हे समजल्यावर अण्णा माळ्यावरून खाली उतरले. मग मात्र कुणीही त्यांच्या वाटेला गेले नाही. काही वर्षांनंतर त्यांची भीती कमी झाल्यानंतर ते पोहायला शिकले.

अण्णा लहान असताना बडोद्याच्या महाराजांनी गावोगाव ब्राह्मणांना गोप्रदाने केली. प्रत्येक ब्राह्मणाला १०/१० रुपये मिळाले. त्या वेळी अण्णांच्या मोठ्या भावाची मुंज झाली होती. वडील परगावी होते. आई घरात एकटीच होती. त्यांनी आईला विचारले, "मी जाऊन १० रुपये घेऊन येऊ का ?" आई म्हणाली, "बाबारे, दक्षिणेसाठी हात पसरणाऱ्यांच्या कुळात तुम्ही जन्माला आला नाहीत. तुमचे मामा दशग्रंथी ब्राह्मण आहेत. त्यांनी कोणत्याही प्रकारचे दान घेतले नाही. तुमचे पूर्वज मोठ्या नावलौकिकाचे होते. तुमचे वडील गरीब असले तरी कुलाभिमान विसरले नाहीत." अशी स्वाभिमानी होती अण्णांची आई. अण्णांचे मामा म्हणजे रँग्लर रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे यांचे वडील. रँग्लर परांजपे व अण्णा आतेमामे भावंडे.

अण्णांच्या लग्नाच्या वेळचा एक प्रसंग. वधुच्या घरी जाताना काही पदार्थ बरोबर घेण्याचे त्यांची आई विसरली. त्या वेळी वधुच्या आजीने "तुम्ही एवढातल्या बायका, या साध्या गोष्टी कशा तुम्हाला उमजत नाहीत." अशा शब्दांनी सर्वांसमक्ष आईला दुखावले. आईने उलट काहीही न बोलता एकदम स्वतःच्या तोंडात मारून घेतली आणि म्हणाली, "माझी, चूक झाली, मला क्षमा करा." सर्व बाया थक्क झाल्या. पुढचा कार्यक्रम निर्विघ्नपणे पार पडला. वरमाईला अशा तऱ्हेने दुखावल्यानंतर त्याचा सूड घेतल्याशिवाय किती बायका राहिल्या असत्या. पण अण्णांच्या आईने लग्नात व त्यानंतरही या घटनेबद्दल काहीही तक्रार केली नाही की कुणालाही दुखावले नाही. हा संयम, ही सहन शक्ती, स्वतःची



चूक कबूल करण्याचा प्रांजलपणा या गोष्टीचा वारसा अण्णांना आईकडून मिळाला होता.

## शिक्षणाच्या वाटचालीतील अपूर्व साहस

अण्णांचे प्राथमिक शिक्षण मुरुडलाच झाले. शाळा सरकारी होती. नावाजलेली होती. निकालही चांगले लागायचे. त्या वेळी धूळपाटीवर शिकवत असत. पाटी स्वच्छ पुसून ओल्या मातीचा अगर खडूचा अगदी पातळ लेप तिच्यावर द्यायचा. लाकडाच्या बोथट लेखणीने त्यावर लिहायचे. अण्णांना सोमण गुरुजींचे मार्गदर्शन लाभले. सोमण गुरुजी तर अण्णांचे दैवत होते. सोमण गुरुजी बुद्धिमान होते. ते विद्यार्थ्यांना अभ्यासाबरोबर समाजसेवेचे धडे देत होते. त्यांच्या देखरेखीखाली अण्णांची झपाट्याने प्रगती होत होती. अण्णा त्यांचे आवडते विद्यार्थी होते. या गुरु-शिष्यांच्या जोडीला लोक रामदास-कल्याण अशा नावाने ओळखू लागले. अमरकोष, रघूचा दुसरा सर्ग शिकून झाला. रिकाम्या वेळात आवडत्या गणित विषयाचा अभ्यास अण्णा करीत असत. अण्णांचे सहावीपर्यंतचे शिक्षण पूर्ण झाले. सतरा वर्षे पूर्ण होईपर्यंत सहावीची परीक्षा देता येत नव्हती. मग दोन वर्षे त्यांनी गावातच काढली. त्या काळात समाजसेवेची कामे तर केलीच शिवाय संस्कृत भाषेचे अध्ययन त्यांनी केले.

त्या काळात सहावीची परीक्षा देण्यासाठी वेगवगळी केंद्रे असत. कोणत्याही केंद्रावर परीक्षेसाठी गेले तरी चालत असे. अण्णांनी परीक्षेसाठी मुंबईला जायचे ठरविले. पण अचानक धो धो पाऊस पडू लागला. कोकणातला पाऊस तो. खाड्या, नाले, पाण्याने भरून गेले. समुद्र उसळ्या घेऊ लागला. मुंबईला जाणारे गलबत त्या दिवशी निघूच शकले नाही. पुढेही दोन-तीन दिवस जाण्याची चिन्हे दिसत नव्हती. पायरस्त्याने रत्नागिरीला जाणे शक्य नव्हते. आता एकच उपाय होता. पायवाटेने सातारला जाणे. परीक्षेला फक्त चारच दिवस राहिले होते.






मुरुडपासून सातारा हा जवळजवळ १०८ मैलाचा प्रवास होता. रस्त्यांची काहीही माहिती नव्हती. पण अण्णांचा व त्यांच्या मित्रांचा उत्साह अपूर्व होता. पाठीवर लहान गाठोडे, त्यात धोतर, सोवळे (मुकटा), तांब्या-भांडे, पुस्तके, फराळाचे पदार्थ. पोहे, दशम्या, लोणचे, शिवाय घोंगडी होती. पाऊस आला की ही घोंगडी खोळ करून अंगावर घ्यायची व रात्री तीच घोंगडी अंथरून झोपायचे.

मुरुडपासून चिपळूण, फलटण, सातारा असा लांब पल्ल्याचा प्रवास होता. मजल दरमजल करत करत चिपळूणपर्यंतचा प्रवास झाला. तेथून कुंभार्ली घाट चढून त्यांनी चिपळूणपर्यंत मजल मारली. तिथे सामानासाठी एक घोडे ठरविले. घोड्याच्या पाठीवर ओझे, सोबत घोड्याचा मालक आणि हे पाच विद्यार्थीवीर असा प्रवास सुरू झाला. मुलांचे पाय खूप थकले होते. अंग जड झाले होते. अजून बरेच अंतर चालायचे होते. वेळ खूप थोडा राहिला होता. पाटणमधील लोकांनी सांगितले होते, ''परीक्षेला लवकर पोहोचायचे असेल तर मोठ्या रस्त्याने न जाता धनगरसड्यापर्यंत खिंडीतून पायवाटेने जावे.'' मुलांना ही कल्पना आवडली. आपण आता वेळेत पोहोचू अशा खात्रीने त्यांनी प्रवासाला सुरुवात केली. पण आता घोडे थकले होते. ते पुढे जायलाच तयार होईना. दोन तीन मैल गेल्यावर तर घोडे मटकन खालीच बसले. काही केल्या उठेना. अर्ध्या खिंडीत पोहोचेपर्यंत अंधार पडला. हिंस्र पशूंची भीती वाटायला लागली. एका बाजूला उंच कडा तर दुसऱ्या बाजूला खोल खोल दरी. मधे दोन हातांची अरुंद वाट. जिकडे तिकडे किर्र झाडी. अशा भयंकर अडचणीतून अण्णा व त्यांचे मित्र चालले होते. घोड्याला वाटेतच सोडून द्यावे लागले. ओझी पाठीवर टाकून मुले नेटाने चालली होती. काळोखात पायाखालची वाटही दिसेना. पहाट झाली, थंडगार वारा सुटला होता. मुले थंडीने गारठून गेली. सकाळी दहापूर्वी सातारला पोहोचायचे होते. पण प्रत्यक्षात मुले सातारला पोहोचली तेव्हा सायंकाळचे पाच वाजले होते. आता परीक्षा हुकली, सगळे

श्रम वाया गेले असे त्यांना वाटले. मुले खूप नाराज झाली. आता परत फिरायचे असा विचार करू लागली. एवढ्यात कुणीतरी त्यांना सांगितले, "अरे, निराश कशाला होता, आज नुसती नावनोंदणी झाली आहे. परीक्षा उद्याच आहे." ते शब्द विद्यार्थ्यांना अमृतवाणीसारखे वाटले. त्यांचे चेहरे आनंदाने फुलून गेले. अण्णांना वाटले आपले स्वप्न आता साकार होणार. पण विधिलिखित निराळेच होते. नियतीने त्यांच्यापुढे वेगळेच ताट वाढून ठेवले होते.

## "अहो मी खरंच सतरा वर्षांचा आहे"

रात्रभर विश्रांती घेऊन मोठ्या उत्साहाने मुले केंद्रावर आली. परीक्षकांची एक कमिटी होती. कमिटीपुढे जाऊन एकेकाने नाव नोंदवायचे होते. अण्णा अदबीने कमिटीपुढे गेले. नमस्कार केला. अण्णांची लहान मूर्ती पाहून कमिटीचे अध्यक्ष गरजले, "वय काय तुझे?" अण्णा म्हणाले, "सतरा वर्षे." "आम्हाला फसवतोस काय?" "अहो, मी खरंच सतरा वर्षाचा आहे." अण्णा काकुळतीस येऊन म्हणाले. "खोटं बोलतोस, तू सतरा वर्षांचा आहेस? किती लहान दिसतोस? जा. घरी जा. दोन वर्षांनी ये परत." परीक्षकांच्या तोंडचे हे अनपेक्षित, अत्यंत कठोर शब्द ऐकताच अण्णांचे धैर्य खचले. ते घाबरले, बावरले. त्यामुळे हा मुलगा नक्कीच खोटे वय सांगतो अशी परीक्षकांची खात्री झाली. "तुला परीक्षेला बसता येणार नाही." असे म्हणून त्यांनी अण्णांकडे दुर्लक्ष केले. स्वतःजवळ शाळेच्या हेडमास्तरांचा दाखला असतानाही तो दाखविण्याचे धैर्य अण्णांना झाले नाही. त्यांच्या भित्रेपणामुळे त्यांचे फार मोठे नुकसान झाले. एखादा धीट मुलगा असता तर त्याने कमिटीला नाव नोंदवायला भाग पाडले असते. अण्णांना फार मनस्ताप झाला. सहावीची परीक्षा देऊन, ट्रेनिंग घेऊन, उत्तम प्रकारचे यश मिळवून मास्तर व्हायचे असे अण्णांचे स्वप्न होते. परीक्षेला बसण्याची परवानगी न मिळाल्यामुळे अण्णा निराश झाले.



त्यावेळी एक चांगली घटना घडली. मुरुड गावात एक इंग्रजी शाळा सुरू झाली. इंग्रजी शिकण्याची जबरदस्त इच्छा अण्णांच्या मनात होतीच. ती आता पूर्ण होणार होती. ती शाळा एका घरातील गोठ्याच्या माळ्यावर सुरू झाली. गोठ्यातून शेणाची दुर्गंधी येत असे. मात्र वरच्या मजल्यावर इंग्रजी भाषेचा अभ्यास मन लावून चालत होता. इंग्रजी पहिलीची परीक्षा झाली. दुसरीची परीक्षा चालू असताना कोल्हापूरला जाऊन अण्णांनी मराठी सहावीची परीक्षा दिली. या वेळी मात्र परीक्षकांनी त्यांना अडवले नाही. इंग्रजी दुसरी, तिसरीची परीक्षा उत्तम गुणाने पास झाल्यामुळे अण्णांचा उत्साह वाढला.

एव्हाना अण्णा १९ वर्षांचे झाले होते. या वयात खरं म्हणजे मुलाने नोकरी धंदा करून घरी मदत करायची. शिवाय त्या काळच्या पद्धतीनुसार १५ वे वर्ष लागताच अण्णांचे लग्नही करण्यात आले होते. त्या वेळी त्यांची पत्नी ९ वर्षांची होती. म्हणजे संसाराची जबाबदारीही त्यांच्यावर होती. मात्र अण्णांच्या वडिलांना वाटायचे अण्णांनी खूप शिकावे, नशीब काढावे. सोमण गुरुजींनी त्यांना पाठिंबा दिला.

अण्णा पुढील शिक्षणासाठी रत्नागिरीला गेले.

तिथे त्यांना स्कॉलरशिप मिळाली. दुर्दैवाने रत्नागिरीची हवा अण्णांना मानवली नाही. मग अण्णा परत मुरुडला आले. नुसतेच स्वस्थ बसून भागणार नव्हते. वडिलांची मिळकत थोडी होती. मग तिथल्याच प्राथमिक शाळेत महिना ५ रु. पगारावर अण्णांनी शिक्षकाची नोकरी पत्करली. शाळा सात तास चालायची. उरलेल्या वेळेत ते इंग्रजीचा अभ्यास करायचे.

15 449

## हात पुढे कर

या अनुभवाचा पुढील शिक्षणासाठी उपयोग करावा अशी त्यांची महत्त्वाकांक्षा होती. आता अण्णांची प्रकृती ठीक झाली होती. अद्याप त्यांचे इंग्रजी शिक्षण पूर्ण व्हायचे होते. रत्नागिरीपेक्षा आता शिक्षणासाठी मुंबईला राहावे अशी उत्कट इच्छा त्यांच्या मनात निर्माण झाली. आई-वडिलांनीही आर्थिक परिस्थिती बिकट असताना सुद्धा त्यांच्या शिक्षणासाठी मदत करायची असे ठरविले.

अण्णा मुंबईच्या रॉबर्ट मनी स्कूल या प्रसिद्ध शाळेत दाखल झाले. पहिल्या चाचणी परीक्षेत ते उत्तम प्रकारे उत्तीर्ण झाले. या वेळी अण्णांचे वय २१ वर्षांचे होते. या शाळेत त्यांच्यावर एक संकट कोसळले. मुलाचे अक्षर चांगले व्हावे म्हणून दररोज इंग्रजी कॉपी काढून आणण्याचा नियम त्या शाळेत होता. अण्णांचे अक्षर प्रारंभापासून चांगले नव्हते. आपल्याला स्कॉलरशिप मिळावी म्हणून अण्णा मनापासून कॉपी काढून आणू लागले. दोन महिन्यांनंतर त्यांचे अक्षर खूपच सुधारले. इतर मुलांपेक्षा ते खूपच सुंदर लिहू लागले त्यामुळे मुलांना शंका येऊ लागली की, अण्णा स्वतः कॉपी काढत नसून दामले नावाच्या मुलाकडून कॉपी काढून घेत असावेत. मुलांनी शिक्षकांकडे तशी तक्रार केली. त्यांचे शिक्षक जॅक्सन साहेब शिस्तप्रिय आणि कडक होते. त्यांनी दोघांच्या वह्या पाहिल्या. दुर्दैवाने त्यांनाही अण्णांचा संशय आला. त्यांचा रागीट चेहरा पाहून अण्णा खूप घाबरले. शिक्षकांनी वेताची छडी आणली. रागाने म्हणाले, ''हात पुढे कर.'' हा तर अण्णांचा फार मोठा अपमान होता. ते खरं बोलत असतानाही त्यांना ही शिक्षा का ? त्यांचे डोळे पाण्याने डबडबले. छडी घेण्यासाठी पुढे केलेला हात त्यांनी कपाळावर मारून घेतला. शिक्षकांना त्यांच्या चेहऱ्याकडे पाहून वाटले कदाचित हा मुलगा खरे बोलत असेल. त्यांनी अण्णांना विचारले, ''तू पुन्हा कॉपी काढून दाखवतोस ?'' ''हो हो मी आत्ता इथे कॉपी काढून दाखवतो.'' असे म्हणून अण्णांनी तोच



मजकूर सुंदर हस्ताक्षरात काढून दाखविला. शिक्षा टळली. शिक्षक खूष झाले. मात्र अण्णांच्या अशा भित्र्या स्वभावामुळे अण्णांवर नेहमी असे प्रसंग येत.

## स्वकष्टाचा पहिला रुपया

शाळेत शिकत असताना अण्णांना त्यांच्या हुशारीमुळे शिष्यवृत्ती मिळत होती. त्यातून पुस्तकांचा, फीचा खर्च भागत होता. मात्र जेवण्याचा व राहण्याचा खर्च भागविण्यासाठी आणखी पैशांची आवश्यकता होती. त्यासाठी अण्णा छोटे छोटे उद्योग करीत. शाळेत असताना एकदा अण्णांच्या मित्राने त्यांना विचारले, ''माझ्या भावाला शिकवशील का?'' अण्णांनी होकार दिला आणि रोज एक तास त्याला शिकवायला सुरुवात केली. महिना निदान दोन रुपये मिळतील असे वाटले होते. परंतु महिना झाल्यानंतर त्यांनी एकच रुपया अण्णांच्या हातावर ठेवला. अण्णांचा थोडा विरस झाला. पण स्वतःच्या कष्टाने मिळविलेला हा पहिला रुपया होता म्हणून त्यांना फार आनंद झाला. त्यांनी एक शिकवणी सुरू केली त्याबद्दल त्यांना दरमहा १ रु. मिळायचा. एका गृहस्थांना दर रविवारी ते ग्रंथ वाचून दाखवीत, त्याबद्दल त्यांना २ आणे मिळत असत. एका सुट्टीत त्यांनी खानेसुमारीच्या वेळी जनगणनेचे काम केले. त्या वेळी दररोज एक रुपया याप्रमाणे १२ दिवसांत १२ रुपये मिळाले. अशीच आणखी कामे ते करीत. या कामातून मिळणारे पैसे ते अत्यंत जपून वापरीत. ते अत्यंत काटकसरीने रहात असत. पैसे वाचवणे हे पैसे मिळविण्यासारखेच असते. या सुभाषिताचे ते तंतोतंत पालन करीत. खानावळ महाग पडायची म्हणून त्यांनी वर्षभर हाताने स्वयंपाक केला. शाळेला सुट्टी लागली तरी गावी जाण्यायेण्याचा खर्च नको म्हणून ते मुंबईतच राहत आणि बारीक-सारीक कामे करीत. जेवणखाण, कपडेलत्ते सर्व ठिकाणी जास्तीत जास्त काटकसर करून दर रुपयाला एक पैसा धर्मदाय अशी वेगळी शिल्लक साठवीत. एकदा असेच त्यांचे ३ रुपये जमले होते.

## परोपकाराचा पहिला धडा

अण्णांना परोपकाराची चांगली संधी चालून आली. ज्यांच्या खानावळीत अण्णा जेवायला जात होते ते नागोपंत दातार क्षयरोगाने आजारी पडून मुरुड गावी आपल्या घरी आले होते. जेमतेम महिन्याभराचे सोबती होते. मुंबईत त्यांनी अण्णांकडून पाच रुपये उसने घेतले होते. ते फेडायला त्यांना सवड झाली नव्हती. त्यांच्या आजारपणामुळे खानावळ बंद पडून ते मुरुडला आले होते. मुरुडला गेल्यावर अण्णा त्यांच्या समाचाराला गेले. घरातील माणसे दुःखी कष्टी होती. अण्णांच्याकडे पाहून नागोपंतांना वाईट वाटले. ते म्हणाले, "तू पैसे मागण्यासाठी आलास का-रे ?" अण्णा म्हणाले, "छे छे, ते पैसे फिटले असे समजा. अहो तुमच्या या अडचणीच्या काळात तुम्हाला मदत व्हावी म्हणून मी हे माझ्याजवळचे तीन रुपये तुम्हाला देण्यासाठी आलो आहे." असे म्हणून अण्णांनी तीन रुपये त्यांच्यापुढे ठेवले. नागोपंतांच्या डोळ्यातून आनंदाश्रू वाहू लागले. परोपकार केल्याने मिळणाऱ्या अवर्णनीय आनंदाचा अनुभवं अण्णांनाही मिळाला. अण्णांचे पैसे सत्कारणी लागले होते.

## पदवी मिळाली पुढे काय ?


कॉलेजचे शिक्षण घेण्यासाठी अण्णा प्रथम विल्सन कॉलेजमध्ये दाखल झाले. तिथे त्यांना ८ रुपये शिष्यवृत्ती मिळायची. अजूनही ते शिकवण्या करीत होते. इंग्रजी शाळेत शिकत असताना त्यांनी आपल्या मामांकडून रँग्लर परांजपे यांच्या वडिलांकडून २०० रुपये कर्ज काढले होते. कॉलेजचे शिक्षण चालू असताना शिकवण्या करून त्यांनी ते कर्ज फेडून टाकले. कॉलेजच्या पहिल्या वर्षाची परीक्षा ते उत्तम प्रकारे पास झाले, एवढेच नव्हे तर गणित विषयासाठी जाहीर केलेले खास पारितोषिकही त्यांना मिळाले. दुसऱ्या वर्षाच्या कॉलेजच्या परीक्षेसाठी मात्र ते एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये गेले. याच कॉलेजमधून १८८४ मध्ये




ते पदवीधर होऊन बाहेर पडले. अण्णांचे हे दैदीप्यमान यश पाहून त्यांच्या आईला, भावाला आणि मित्रमंडळींना खूप आनंद झाला. प्रतिकूल परिस्थितीशी टक्कर देऊन अनंत अडचणी, हालअपेष्टा सोसून अण्णांनी जिद्दीने, कठोर परिश्रमाने हे यश संपादन केले होते.

आयुष्याच्या अत्यंत महत्त्वाच्या काळात अण्णांना नरहरपंत जोशींसारखा चारित्र्यसंपन्न, स्वाभिमानी, बुद्धिमान, गुणी मित्र मिळाला. त्यांच्या विचारांचा, कर्तृत्वाचा प्रभाव अण्णांवर पडला. त्यांच्यामुळेच अण्णांचे मुंबईतील वास्तव्य यशस्वी झाले.

बी. ए. नंतर एम. ए. च्या परीक्षेला बसण्याची त्यांची इच्छा होती. पण आर्थिक व प्रापंचिक अडचणीपुढे त्यांना तो विचार सोडावा लागला. अण्णा पदवीधर झाले पण पुढे काय ? खरं तर त्या काळात पदवीधर माणसाला सरकारी नोकरी मिळणे सहज शक्य होते. पण अशी नोकरी अण्णांच्या ध्येयवादी स्वभावाला कशी मानवणार ? आत्तापर्यंत त्यांनी अनेक शिकवण्या केल्या होत्या. शिक्षकी पेशाच आपल्या प्रकृतीशी, स्वभावाशी जुळेल या विचाराने अण्णांनी शिक्षकाचे काम करावयाचे ठरविले. गणित शिकवण्यात तर त्यांचा लौकिक होता. मुंबईच्या निरनिराळ्या तीन शाळांत अण्णा शिक्षकाचे काम करू लागले. पहाटे चार वाजता उठून रात्रीचा दहीभात खायचा. मग गिरगावातून निघायचे. ते माझगावच्या शाळेत जायचे. तेथे ७.३० पर्यंत शिकवायचे व नंतर ९ पर्यंत शिकवण्या करून चहा-पाव खाऊन ट्रामने अलेक्झांड्रा मुलांच्या शाळेत जायचे. तिथले शिकवणे झाले की पारशी मुलांच्या शाळेत जात. तेथून घरी येऊन, जेवण करून, थोडी विश्रांती घेऊन, दुपारी ३ च्या सुमारास अण्णा मराठा हायस्कूलमध्ये जात. मग फोर्टमधले हायस्कूल गाठायचे. सबंध दिवसभर त्यांची अशी ओढाताण चालायची. अण्णांची चिकाटी कौतुकास्पद होती. एखादे काम करायचे ठरले की ते त्याचा पिच्छा पुरवीत असत.




"उशाला धोंडा, भुकेला कोंडा" असे
खडतर विद्यार्थी जीवन जगत
एलफिन्स्टन महाविद्यालयातून ते
१८८४ साली वयाच्या २७ व्या वर्षी
बी. ए. झाले.



शिक्षण संपले ...
गृहस्थाश्रमातील सुख व आराम यात
रमून जाण्याऐवजी समाजकार्य
करण्यासाठी काटेरी पाऊलवाटेवर
त्यांची जीवनाची वाटचाल सुरू झाली.
रानडे, दादाभाई नौरोजी, गोखले,
आगरकर अशा थोर नेत्यांपासून
त्यांनी स्फूर्ति घेतली.

## समाजसेवेचे स्वप्न

या काळात महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनात न्या. रानडे, लो. टिळक, गोपाळ गणेश आगरकर यांच्यासारखी तेजस्वी रत्ने स्वार्थत्यागपूर्वक देशकार्यात मग्न होती. महाराष्ट्रातील तो कालखंडच असा होता. एकेकाच्या मनात एकेका कार्याचे बीज रुजून त्याला धुमारे फुटावेत. एकेका कल्पनेने वेडे होऊन त्याच्या पूर्ततेसाठी सर्वस्व पणाला लावावे. अण्णांना स्त्रियांची स्थिती सुधारण्याच्या कल्पनेने वेडे केले होते. त्यांच्यापूर्वीच्या काळातील ईश्वरचंद्र विद्यासागर, विष्णुशास्त्री चिपळूणकर, महात्मा फुले, न्या. रानडे, प्रि. आगरकर यांचे आदर्श त्यांच्या डोळ्यासमोर होते.

प्रत्येक सुशिक्षित माणसाने समाज-ऋण फेडलेच पाहिजे असे विचार त्या काळात मांडले जात होते. आपल्या स्वभावाला आवडेल असे देश कार्याचे क्षेत्र सुदैवाने अण्णांना सापडले ते म्हणजे **''स्त्री शिक्षण.''**

१००/१५० वर्षांपूर्वी मुलींना शिकविणे म्हणजे पाप समजले जाई. या काळात मुलींची लग्ने लहान वयात म्हणजे ७/८ व्या वर्षीच होत असत. लग्न म्हणजे काय, पतीचे नाते काय, हे देखील या वयात कळत नसे. या बालवयातच त्यांना वैधव्य आले तर त्यांच्या दुःखाला अंतच राहत नसे. त्यांचे सुंदर, लांबसडक केस कापून त्यांना विद्रूप केले जाई. हे वय खरे तर उमलण्याचे, फुलण्याचे, खेळण्याबागडण्याचे. पण वैधव्य आल्याने या कळ्या उमलण्यापूर्वीच सुकून जात. अष्टौप्रहर अंधारात, त्यांना मोलकरणीसारखे कामाचे डोंगर उपसावे लागत. समाजाकडून त्यांच्या वाट्याला यायचा फक्त तिरस्कार, उपेक्षा आणि हेटाळणी ! अशा दुर्दैवी बालविधवा, निराधार अबला, स्त्रियांची दुःखे पाहून अण्णांचे मन व्यथित व्हायचे.

आगरकरांचे स्त्रियांच्या दुर्दशेविषयीचे विचार वाचताना अण्णांच्या मनात कालवाकालव होत असे. बालविवाह, विधवांची दुर्दशा, शिक्षण



नसल्याने होणारी स्त्रियांची परवड याविषयीचे लेख वाचून ते अस्वस्थ होत. स्त्री शिक्षणाच्या पवित्र कार्याकडे वळलेल्या अण्णांना स्त्रियांची स्थिती बदलण्यासाठी आपण काहीतरी केले पाहिजे असे उत्कटतेने वाटत होते. नेमके काय करावे हे मात्र त्यांना उमगत नव्हते. नुसते लेख लिहून, सभा संमेलनात भाषणे करून, चर्चा, ठराव करून ही परिस्थिती बदलणे शक्य नव्हते. नुसते बोलण्यापेक्षा प्रत्यक्ष कृती करण्यावर अण्णांचा भर होता. अशा मनःस्थितीत असताना इ. स. १८९१ मध्ये अण्णांवर फार मोठे संकट कोसळले. त्यांची पत्नी राधाबाई यांचे निधन झाले. अण्णांना जबरदस्त धक्का बसला. या दुःखात असताना एक अकल्पित घटना घडली. फर्ग्युसन कॉलेजमधील प्राध्यापक गोपाळ कृष्ण गोखले यांचे पत्र अण्णांना मिळाले. फर्ग्युसन कॉलेजमध्ये त्या वेळी गणिताच्या प्राध्यापकाची जागा रिकामी झाली होती. ''त्या ठिकाणी तुम्ही येता का?'' असे त्यांनी पत्रात विचारले होते. फर्ग्युसन कॉलेजसारख्या सुप्रसिद्ध संस्थेत काम करण्याची अपूर्व संधी चालून आली होती. सेवा, स्वार्थत्याग, देशभक्ती यांचा त्रिवेणी संगम असलेल्या संस्थेत सुप्रसिद्ध समाज सुधारक आगरकर यांच्याबरोबर काम करायला मिळणार या कल्पनेने अण्णांना अतिशय आनंद झाला. १५ नोव्हेंबर १८९१ रोजी अण्णा या नव्या कामावर रुजू झाले. त्यांच्या नोकरीचा चांगला जम बसला. आता पुनर्विवाहासाठी वधुपिते त्यांच्याकडे हेलपाटे घालू लागले. नातेवाईकही अण्णांना लग्नाचा आग्रह करू लागले. अण्णांना एक लहान मुलगा होता. त्याचे पालनपोषण करावयाचे म्हणजे आज ना उद्या लग्न करावेच लागणार होते. राधाबाईंच्या मृत्यूनंतर अण्णांची विवेकबुद्धी त्यांना विचारी, ''तू सामान्य माणसाप्रमाणे भ्याड मनाने जनरूढीला बळी पडणार का? का मनाला पवित्र वाटणाऱ्या नवीन मार्गाचे धैर्याने अवलंबन करणार? अखेर सद्विचारांचा जय झाला. लग्न करायचे तर ते विधवेशीच असा पक्का निश्चय त्यांनी केला. अण्णांचा हा निर्णय क्रांतिकारक होता. त्यांना याची पूर्ण जाणीव होती. ते दिसायला जेवढे साधेभोळे तेवढेच कणखर होते.

## समाजिक क्रांतीचा श्रीगणेशा

अण्णांचे परममित्र श्री. नरहर जोशी यांची गोदूताई नावाची बहीण होती. बिचारी बालविधवा होती. आठव्या वर्षी तिचे लग्न झाले आणि तीन महिन्यांत नवरा वारला. गोदूबाईंचे वडील सुधारक विचाराचे होते. अण्णासाहेबांचा "पुनर्विवाह करायचा झाला तर विधवेशीस करीन" हा निश्चय त्यांना समजला. त्यांनी अण्णांची भेट घेऊन विचारले, "गोदूबाईंशी लग्न करणार का?" त्या वेळी गोदूबाई पंडिता रमाबाई यांच्या शारदा सदनात शिकत होत्या. थोड्या दिवसानंतर अण्णांनी होकार कळविला. ११ मार्च १८९३ रोजी पुणे येथे डॉ. भांडारकर यांच्या बंगल्यात अण्णासाहेबांचा गोदूबाई या बालविधवेशी पुनर्विवाह झाला. निमंत्रण पत्रिका प्रि. आगरकर यांच्या सहीने काढली होती. अण्णांनी गोदूबाईचे नाव "आनंदी" असे ठेवले.

बालविधवेशी लग्न करून अण्णांनी सामाजिक क्रांतीचे रणशिंग फुंकले. महाराष्ट्रात त्या काळात हा पुनर्विवाह फार गाजला. विधवेशी लग्न म्हणजे समाजाच्या क्रोधाला आव्हान ! बहिष्काराला आमंत्रण ! केसरी, सुधारक यासारख्या दोन-चार वृत्तपत्रांनी त्यांचे अभिनंदन केले. सुधारकाचार्य श्री. आगरकर यांनी नव्या दांपत्याला घरी बोलावून सत्कारही केला. पंडिता रमाबाईंनी गोदूबाईंना आहेर करून ओटी भरली.

सौभाग्याचे लेणे लेवून आनंदीने घरात प्रवेश केला खरा पण समाजाने शिव्याशापांची लाखोली वाहून त्यांचा धिक्कार केला. त्यांना वाळीत टाकले. घरादारावर बहिष्कार टाकला. मुरुडच्या ग्रामस्थांनी अण्णांच्या आई-वडिलांना व भावांनाही वाळीत टाकले. लग्नानंतर प्रथमच अण्णा जेव्हा मुरुडला गेले तेव्हा गावकऱ्यांनी सभा घेऊन निर्णय घेतला की १) अण्णांना घेऊन एका बैठकीवर बसू नये. २) ते ज्या सभेत असतील तेथे जाऊ नये. ३) त्यांनी पुन्हा गावात येऊ नये. यासाठी त्यांचे भाऊ भिकाजीपंत यांच्यावरही बहिष्कार घालावा. या बहिष्कारामुळे



पुन्हा लग्न करण्याचा प्रश्न पुढे आल्यावर अल्पवयीन कुमारिकेशी विवाह करणे अण्णांच्या मनाला रुचले नाही. विधवांची करुण स्थिती पाहून त्यांचे अंतःकरण हेलावले.



पंडिता रमाबाई यांनी चालविलेल्या शारदा सदनात शिकत असलेल्या त्यांच्या मित्राच्या बालविधवा बहिणीशी त्यांनी १३ मार्च, १८९३ रोजी समाजसुधारक आगरकरांच्या उपस्थितीत विवाह केला



मुलीच्या सनातनी वृत्तीच्या वडिलांनी विवाहास मान्यता दिली. पण सभोवतालचा समाज मात्र अण्णांवर फुत्कार टाकू लागला. खुद्ध त्यांच्या मुरूड गावी त्यांच्यावर बहिष्कार घातला गेला व जबरदस्त मानहानी त्यांना सहन करावी लागली.



त्यांच्या आईला, भावाला मरणप्राय दुःख झाले. भाऊ तर या बहिष्कारामुळे भ्रमिष्ट झाले. कुटुंब दुरावले. आधी याची कल्पना आली असती तर कदाचित आपण हे पाऊल उचललेही नसते, या विचाराने अण्णा व्यथित होत. त्यांच्यावर टाकलेला बहिष्कार त्यांनी निमूटपणे सोसला. पण आई आणि भावाची अवस्था पाहून त्यांचे काळीज तिळतीळ तुटत असे. या स्थितीचे वर्णन करताना ते म्हणतात, ''या पुनर्विवाहामुळे मी प्रियजनांच्या प्रेमाला अंतरलो. कुळाला कलंक लावणारा ठरलो. माझ्यामुळे त्यांना खाली मान घालण्याचा प्रसंग आला.'' तरीही त्यांनी मनाची समजूत घातली. ''बहुजन समाजाच्या मताविरुद्ध मी ही गोष्ट केली आहे. त्याबद्दल मला जो त्रास होईल तो भोगण्यास मी तयार आहे. समाज ज्या रीतीने वागवील त्या रीतीची वागणूक मी सहन केली पाहिजे. जी गोष्ट लोकांना आज पटली नाही तरी उद्या पटेल, यासाठी रागावून चालणार नाही. भांडून चालणार नाही, लोक मूर्ख आहेत म्हणून शिव्या देऊनही चालणार नाही.'' अण्णांनी स्थितप्रज्ञ व शांत वृत्तीने सारे सहन केले. ते निराश झाले नाहीत. उलट स्त्रियांच्या शिक्षणाच्या योजना अधिक जोमाने त्यांच्या मनात तयार होऊ लागल्या.

## अबलांचे कैवारी

आपण विधवा विवाह केला. एका बालविधवेच्या जीवनात आनंदाची फुलबाग फुलवली, यासाठी समाजाचा बहिष्कार, छळ, निंदा सारे काही सहन केले. आता आपले समाजाविषयीचे कर्तव्य संपले, असा विचार अण्णांच्या मनात कधीही आला नाही. त्यांना वाटे नुसता विधवा-विवाह स्त्रियांच्या उन्नतीसाठी पुरेसा नाही. स्त्री सुशिक्षित झाल्याखेरीज, आपल्या भवितव्याचा निर्णय करण्यास समर्थ झाल्याखेरीज, हा प्रश्न सुटणार नाही. दीर्घ विचाराने अण्णांना खात्री वाटू लागली की विधवा विवाहापेक्षा विधवांच्या शिक्षणाला लोकांचा कमी विरोध होईल. सुशिक्षण आणि नैतिकतेच्या कल्पना समाजात रुजल्याशिवाय पुनर्विवाहाला

प्रोत्साहन मिळणार नाही, विवाहाची वयोमर्यादा वाढणार नाही. या प्रबोधनासाठी स्त्रियांच्या शिक्षणाकडे लक्ष केंद्रित करण्याचे त्यांनी ठरवले. चांगले विचार फार काळ टिकत नाहीत, ते तीव्र असतानाच माणसाने चांगले कार्य उरकून घ्यावे असे अण्णांचे मत होते. अण्णा लगेच कामाला लागले.

ज्या काळात स्त्रियांच्या शिक्षणाबद्दल बोलणे, लिहिणे हे देखील निषिद्ध, धर्मविरुद्ध मानले जाई त्या काळात बालविधवांना शिक्षण देऊन स्वावलंबी बनिवणे म्हणजे समाजद्रोहच मानला जाई. पण अण्णांनी हे धाडस करण्याचे ठरविले.

२५ मे १८९६ च्या सुधारक नावाच्या वृत्तपत्रात अण्णांनी अशा स्त्रियांच्या उद्धाराबद्दलचे आपले विचार व्यक्त करणारे पत्र प्रसिद्धीला दिले. त्याचा थोडासा अनुकूल परिणाम झाला हे लक्षात घेऊन त्यांनी समविचारी मंडळींची सभा पुण्यात भिडे यांच्या वाड्यात घेतली. तो दिवस होता – १४ जून १८९६.

## इवलेसे रोप लावियेले दारी

१४ जून १८८६ या दिवशी ''अनाथ बालिकाश्रमा''ची स्थापना झाली. या संस्थेचे पहिले अध्यक्ष सर रामकृष्णपंत भांडारकर होते. धोंडो केशव कर्वे म्हणजे अण्णा स्वतः चिटणीस झाले. संस्थेच्या मदतीसाठी अण्णा वर्गणी जमवू लागले. उन्हातान्हात, पावसापाण्यात, थंडी-वाऱ्यात, घरोघरी चालत जाऊन ते पै-पैसा जमवत होते. त्यांनी स्वतःची एक हजार रुपयांची शिल्लक संस्थेला दिली, शिवाय भविष्य काळात तरतूद म्हणून घेतलेली ५ हजार रुपयांची विमा पॉलिसी त्यांनी संस्थेला देऊन टाकली, तेही नाव न सांगता. तन-मन-धनाने त्यांनी संस्थेसाठी स्वतःला वाहून घेतले. १८९९ मध्ये पुण्यातच सदाशिव पेठेत भिडे यांच्या वाड्यात आश्रमाच्या कार्याला प्रारंभ झाला. त्या वेळी आश्रमात एक विद्यार्थिनी होती. त्याच वर्षी पुण्यात प्लेगची साथ सुरू झाली. गावातले लोक



गावाबाहेर जाऊ लागले. अण्णांचा हा आश्रम कुठे जाणार? अशा वेळी रा. ब. गणेश गोविंद गोखले नावाचे सज्जन दानशूर गृहस्थ आश्रमाच्या मदतीसाठी पुढे आले. त्यांनी पुण्यापासून जवळ असलेली हिंगणे बुद्रुक-सध्याचे कर्वेनगर येथे असलेली ६ एकर जागा आश्रमाला मोफत दिली. शिवाय ५०० रुपये खर्च करून छोटीशी झोपडीही बांधून दिली. याच झोपडीत १९०० मध्ये आश्रमाचे काम सुरू झाले. ही मूळ झोपडी आजही अस्तित्वात आहे. ती सर्वांना पूजनीय स्फूर्तिस्थान वाटते.

आश्रमाची जागा लांब पडत होती, पण विधवांच्या शिक्षणाला समाजाचा होणारा विरोध, अण्णांचा अबोल, भिडस्त, भित्रा स्वभाव यामुळे समाजापासून दूर राहून हाती घेतलेले कार्य निर्वेधपणे चालू राहण्याच्या दृष्टीने हीच जागा योग्य होती. शहरापासून, मनुष्य, वस्तीपासून दूर रात्री मिणमिण कंदिल, भणभण वारे ! अंधाराच्या साम्राज्यात या झोपडीत स्त्रियांची जीवने फुलविण्याचा ध्यास घेतलेल्या अण्णांनी ज्ञानाची ज्योत प्रज्वलित केली. हीन-दीन अवलांच्या, बालविधवांच्या जीवनात हा संजीवक क्षण ठरला. हिंगण्याच्या निर्जन, खडकाळ, काट्याकुट्याच्या माळावर स्त्री शिक्षणाचे बीज पेरले गेले. दोन विधवा व दोन कुमारिका या वेळी आश्रमात वास्तव्यासाठी आल्या होत्या.

दिवसभर फर्ग्युसन कॉलेजमध्ये शिकवायचे, गावातील कामे करायची, वर्गणीसाठी हिंडायचे. संध्याकाळी पायी चालत आश्रमात यायचे. येताना धान्यधुन्य, भाजीपाला व इतर सामानाच्या पिशव्या पाठीवर टाकून आणायच्या. रस्ताही चांगला नव्हता. खाचखळगे, वाढलेले गवत, दगडधोंडे ओलांडून यावे लागत होते. विंचवा-सापाचीही भीती असायची. रात्री मुलींना शिकवायचे, हिशेब लिहायचे, पहाटे उठून परत कॉलेजसाठी गावात जायचे असा अण्णांचा दिनक्रम असे. स्वयंपाकपाणी, दळण-कांडण ही सर्व कामे आश्रमातील मुलीच करायच्या. आश्रम हिंगण्याला आल्यानंतर सुरुवातीला दोन तीन वर्षे अतिशय कष्टाची गेली. सनातनी मंडळींचा विरोध सहन करावा लागला.

वर्गणी मिळविण्यास खूप कष्ट पडायचे. विधवांची संस्था, धर्म बुडवी संस्था असा अपप्रचार वृत्तपत्रातही चालू होता. मात्र अण्णांनी धीमेपणाने, चिकाटीने काम सुरूच ठेवले. प्राचीन काळच्या ऋषीमुनीं प्रमाणे अण्णांची कठोर तपश्चर्या चालू होती. या तपश्चर्येचे फळ हळूहळू मिळू लागले.

कठोर परिश्रम, जिद्द, चिकाटी, प्रामाणिकपणा, स्त्री-शिक्षणाविषयीची तळमळ, निर्मळ, शुद्ध चारित्र्य, वर्गणीचा चोख हिशेब या सर्व गोष्टींमुळे लोकांचा आश्रमाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलू लागला. लोकांना स्त्री-शिक्षणाच्या कार्याची उपयुक्तता पटू लागली. समाजाच्या विरोधाची धार बोथट होऊ लागली.

अनेक श्रीमंत दाते आश्रमाच्या कार्याला मदत करण्यासाठी पुढे येऊ लागले.

## माझा रामेश्वर मला इथेच भेटला

राजस्थानातील एका संस्थेचे कोषाध्यक्ष फाटक नावाचे एक गृहस्थ होते. त्यांनी आश्रमाची माहिती वाचली होती. त्यांचा डॉक्टर मुलगा प्लेगच्या साथीत वारला होता. अशा दुःखात असतानाही त्यांनी आश्रमाला भेट दिली. खरं तर ते व त्यांची पत्नी रामेश्वराच्या यात्रेला निघाली होती. आश्रम पाहिल्यानंतर मात्र अण्णांचे कार्य त्यांना खूपच आवडले. रामेश्वराच्या यात्रेसाठी ठेवलेले ५००/- रुपये अण्णांच्या हातावर ठेवून ते मोकळे झाले व म्हणाले, ''माझा रामेश्वर मला इथेच भेटला.''

दुसरे पंडित नावाचे गृहस्थ होते. तेही राजस्थानातले राजकोटला राहणारे. आश्रमातले कामकाज, शिस्त पाहून तेही प्रभावित झाले. त्यांनी चटकन चेकबुक काढले. ३०० रुपयांचा आकडा लिहिला, खाली स्वाक्षरी केली. अण्णासाहेबांना चेक देऊन ते म्हणाले, ''हे तीनशे रुपये तातुरते. आता प्रतिमासी ५० रुपये पाठवीत जाईन. मला तुमचे कार्य आवडले आहे.'' पुढे त्यांनी ५० रुपयांचे ७५ रुपये केले. १९०४ साली अण्णांनी संस्थेसाठी इमारत बांधायला काढली. पंडितांनी थैली सोडली व एक हजार रुपये अण्णासाहेबांपुढे ठेवले. त्यांचे हे औदार्य, दातृत्व पाहून अण्णासाहेबांचे हृदय भरून आले. त्यांनी पंडितांना कृतज्ञतेचे पत्र पाठविले तर उलट पंडितांनी पत्र पाठविले, ''अहो, मी उपकार केले नाहीत तुमच्यावर. तुम्ही व तुमच्या संस्थेने उलट मला माझ्या धनाला योग्य मार्ग दाखवून धन्य केले.'' यानंतर इमारत पुरी होईपर्यंत दरमहा ५०० रुपये पंडितांकडून येत होते.



एकदा नाटककार देवल आश्रमात आले. त्यांनी ३०००/- रुपये अण्णासाहेबांच्या हातावर ठेवले आणि म्हणाले, ''या पैशातून आश्रमात एक गीतामंदिर बांधा. मुलींपुढे चांगले देवाधर्माचे आदर्श राहतील व माझीही इच्छा तृप्त होईल.''

स्वदेशी धनिकांनी जशी मदत केली तशीच परदेशातील दानशूर व्यक्तींचीही मदत मिळाली. इंग्लंडमधील मिस मॅनिंग या बाई १८९९ मध्येच आश्रमात आल्या होत्या. अण्णासाहेबांचे कार्य पाहून त्या खूश झाल्या व म्हणाल्या, ''मी प्रतिवर्षी ३० रुपये देत जाईन.'' अण्णा म्हणाले, ''ठीक आहे. द्या. माझा हात पुढेच आहे. संस्थेसाठी कुबेराने सगळी संपत्ती दिली तरी मी घेईन.''

एकदा असेच परदेशातील एक व्हटवर्य नावाचे न्यायाधीश यांनी आश्रमाची माहिती ऐकली. ते दरवर्षी ५० रुपये पाठवू लागले. त्यांनी तर मृत्युपत्रातसुद्धा ५०० रुपये अण्णांच्या आश्रमासाठी ठेवले होते.

अशा देणग्या मिळाल्या, लोकांचे असे आशीर्वाद मिळाले की अण्णांना नवा हुरूप येई. महात्मा गांधी, कस्तुरबा, लाला लजपतराय, अरविंद बाबू, पंडित नेहरू, स्वातंत्र्यवीर सावरकर, सरोजिनी नायडू असे कितीतरी राष्ट्रीय पातळीवरील नेते आश्रमात आले. त्यांनी अण्णांचे स्त्री- शिक्षणाचे काम पाहिले, त्यांच्या कार्याची प्रशंसा केली, त्यांना धन्यवाद दिले.

पण सामाजिक बहिष्काराच्या भीतीने त्यांचे घरचे नातेवाईक मात्र आश्रमात आले नव्हते. अण्णांना खूप वाईट वाटे. त्यांना वाटे दूरदूरचे लोक येतात, माझ्या कामाचे कौतुक करतात पण घरच्या मंडळींची मात्र भेट होत नाही. पण एकदा असाच योग आला. १९०२ साली अण्णांची आई आणि भाऊ पंढरपूरहून परत येत होते. ते पुण्यात राहिले होते. अण्णांना ही बातमी समजली. ते धावतच तिकडे गेले. डोळ्यात पाणी आणून आईला, भावाला म्हणाले, ''हे पहा माझ्यावर समाजाचा राग आहे. तेव्हा तुम्ही माझ्या घरी या असे मी म्हणत नाही. पण एक मात्र तुम्ही करावे अशी माझी इच्छा आहे. तुम्ही माझ्या आश्रमात या, आपल्या मुलाने, भावाने कोणते कार्य आरंभले आहे, ते कसे चालवले आहे हे पहा तरी एकदा.'' अण्णांची विनंती त्यांना मोडवेना, ते दोघे आश्रमात आले. आश्रम पाहून त्यांना खूपच समाधान वाटले. पाहता पाहता आनंदाश्रूंनी डोळे पाणावले.

## असा झाला विद्यालयाचा जन्म

नव्या उमेदीने अण्णा बालिकाश्रमासाठी झटू लागले. आता बालिकाश्रमात पुणे, मुंबई, रत्नागिरी, सातारा, कोल्हापूर, अहमदनगर, बेळगाव, मध्यप्रदेश, वऱ्हाड, ग्वाल्हेर, इंदूर, ठाणे, खानदेश, सावंतवाडी, मंगलोर अशा विविध ठिकाणच्या ब्राह्मण, मराठा, वाणी, धनगर, तेलगू अशा विविध जातीच्या सुमारे २०० विद्यार्थिनी शिक्षण घेत होत्या.

अनाथ बालिकाश्रमाचा सर्वांत मोठा फायदा म्हणजे विधवा स्त्रियांच्या मनामध्ये नवा आशेचा अंकुर उत्पन्न झाला. शिक्षणाने मने सुसंस्कृत झाली. आपल्याला स्वावलंबी होता येईल असा विश्वास निर्माण झाला. आश्रमात येण्यापूर्वी त्यांच्या मनात विचार येत असे, ''आपण जगून तरी काय करायचे ?'' पण आता आश्रमातील वास्तव्यानंतर मात्र मनात विचार येत, आपले जीवन स्वतःच्या आणि देशाच्याही उपयोगी



पडण्यासाठी मौल्यवान आहे. विधवांच्या मनोवृत्तीत, विचारात पडणारा हा फरक निश्चितच क्रांतिकारक होता. ही क्रांती घडविली होती स्त्री शिक्षणासाठी, विशेषतः विधवा, परित्यक्ता यांच्या उन्नतीसाठी स्वतःला वाहून घेणाऱ्या कृतिशील समाजसुधारक महर्षी अण्णासाहेब कर्वे यांनी.

आश्रम बाल्यावस्थेत असताना महिला विद्यालयाचे बीज नकळत पेरले गेले. रत्नागिरी जिल्हातल्या एका गृहस्थांचे अण्णांना पत्र मिळाले. ''माझ्या चौदा, बारा, दहा वर्षांच्या तीन मुली आहेत. मोठी मुलगी विधवा असून दोन कुमारिका आहेत. त्या सर्वांना आश्रमात शिक्षणासाठी पाठवावे अशी माझी इच्छा आहे. माझ्याकडून आर्थिक मदत होऊ शकणार नाही. तीनही मुलींचा भार आश्रमावर पडेल. विचार करून कळवावे.'' मुली कशा आहेत ते पाहून निर्णय देऊ असा विचार करून अण्णा स्वतः त्या कुटुंबाकडे गेले. त्या मुली हुशार, चुणचुणीत, तरतरीत वाटल्या. त्यांना आश्रमात जरूर प्रवेश द्यायचा असे अण्णांनी ठरविले. मात्र त्यांनी एक अट घातली. मुलीचे वय १८ ते २० वर्षे होईपर्यंत तिचे लग्न करणार नाही. ही अट पालकांनी मान्य केली व मुली आश्रमात राहून शिकू लागल्या. हाच महिला विद्यालयाचा खरा आरंभ होय.

आश्रमातील राहणी, अभ्यासक्रम लोकांना आवडू लागला. बरेच लोक विधवांबरोबर कुमारिकांनाही आश्रमात पाठवू लागले. विद्यार्थिनींची संख्या वाढू लागली. स्त्री शिक्षणाचे बीज अंकुरत होते. रोप वाढत होते. आता या विद्यार्थिनींना सुशिक्षित, स्वावलंबी बनविण्यासाठी स्वतंत्र विद्यालयाची गरज भासू लागली. ४ मार्च १९०७ रोजी रंगपंचमीच्या दिवशी पुण्यात लकडी पुलाजवळ डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या जुन्या वाड्यात महिला विद्यालयाची स्थापना झाली. सुरुवातीला या विद्यालयात सहा विद्यार्थिनी होत्या. महिला विद्यालयाचा मुख्य उद्देश होता महिलांना गृहिणीपदाची कर्तव्ये, जबाबदाऱ्या याची जाणीव करून देणारे शिक्षण देणे. त्याचप्रमाणे समाजविषयक कर्तव्यांची

ओळख करून देणारे शिक्षण देऊन समाजात सुशिक्षित स्त्रिया तयार करणे. मुलींच्या विवाहाची मर्यादा २० वर्षांपर्यंत असावी असाही अण्णांचा आग्रह होता. धर्मशिक्षण, नीतिशिक्षण, याचबरोबर भिन्न जाती धर्माबद्दल उदार वृत्ती बाळगणे, अशा वृत्तींची जोपासना करणे हाही हेतू होता. साधी राहणी, उच्च विचारसरणी याचा अवलंब करून स्वतःची कामे स्वतः करायची, शिवाय इतरांना मदत करण्याची वृत्ती महिलांच्या अंगी बाणवण्याचे प्रयत्न अण्णांना करायचे होते.

## स्त्री-शिक्षण विषयक विचार

स्त्री शक्तीवर अण्णांचा विश्वास होता. स्त्री मुक्तीबद्दल अण्णांचे विचार मननीय होते. ते म्हणत, "स्त्री दास्य विमोचन चळवळ आम्हाला मान्य नाही. उलट स्त्रीचे मुक्त क्षेत्र तिचे घर आहे. या कार्यक्षेत्रात पत्नी, माता म्हणून तिचा योग्य सन्मान झालाच पाहिजे. हे स्थान केवळ गृहकृत्याच्या उपयोगी किंवा शोभेचे साधन असे नसून कुटुंबात जी विश्वबंधुत्वाची भावना नांदायला हवी, या भावनेने, उत्साहाने समरस होणारी या दृष्टीने स्त्रीचे स्थान अनन्यसाधारण आहे."

स्त्री शिक्षणाच्या संबंधात कुमारिकांच्या लग्नाच्या वयोमर्यादा वाढविण्याच्या संदर्भात अण्णा सतत विचार करीत असत. यातूनच ब्रह्मचर्य फंडाची कल्पना पुढे आली. "२० वर्षे होईपर्यंत मुलीचे लग्न करणार नाही. मुलीचे शिक्षण आपल्या देखरेखीखाली चालेल" असे पालकांनी लिहून द्यायचे. संस्थेने १६-१७ वर्षांपर्यंत मुलींचे शिक्षण चालू ठेवून ती होतकरू असल्यास, तिला हौस असल्यास अधिक शिकू द्यायचे किंवा लग्नाला परवानगी द्यायची. यामुळे प्रौढ विवाहास प्रोत्साहन मिळाले. विवाहाची मर्यादा वाढविण्यासाठी, लोकांचे प्रबोधन करण्यासाठी, आकाशवाणी, दूरदर्शन, वृत्तपत्रे अशा विविध प्रचार माध्यमाद्वारे आपण आत्ता प्रयत्न करत आहोत. मात्र अण्णांनी हे प्रयत्न १०० वर्षांपूर्वीच केले होते. स्त्रियांच्या विवाहातील चालीरितीबद्दल



अण्णांचे विचार परखड व सडेतोड होते. कन्यादानाची कल्पना अण्णांना बिलकूल मान्य नव्हती. कन्येचे दान ही गोष्टच त्यांच्या विवेकबुद्धीला पटत नसे. प्रौढ विवाह हे स्वयंवर स्वरूपाचे असावेत. स्वयंवर शब्दाला शोभेल असा काहीतरी विधी असावा असे त्यांना वाटे. अण्णा म्हणत, "नीती नियम स्त्री-पुरुषांना समान असावेत. अल्पवयीन मुलामुलींना विधुर किंवा विधवा समजले जाऊ नये. ज्यांनी संसारसुखाचा अनुभव घेतला नाही त्यांचे पुनर्विवाह हा प्रथम विवाह मानला जावा. आपली मुलगी शोभेल अशा मुलीशी लग्न करणे ही शुद्ध अनीती आहे." आजच्या काळातही ही मूल्ये जुनी झाली नाहीत. आजही हे विचार उद्बोधक, मार्गदर्शक आहेत. "स्त्रियांमध्ये शिक्षणाचा प्रसार करणे हे अत्यंत पवित्र देशकार्य, धर्मकार्य आहे. यासाठी केलेले विचार, आचार हीच परमेश्वराची प्रार्थना आहे. हेच जन्माचे सार्थक अशी आपली वृत्ती बनली पाहिजे." असे अण्णांचे मत होते.

"स्त्री शिक्षणाच्या कार्याची लांबी, रुंदी, खोली वाढविण्याच्या महत् कार्यासाठी मी आपले जीवन अर्पण करीन अशी आपल्या मनाची तयारी असली पाहिजे. अशा प्रकारचा प्रयत्न करण्याचा मोह मला पडला आहे. या जन्मात यश न आल्यास त्याच ध्यासात राहून हा देह ठेवावा व कार्यपूर्तीसाठी पुन्हा जन्म घेऊन यावे अशी माझी इच्छा आहे." असे अण्णा नेहमी म्हणत असत.

## निष्काम कर्म मठ

अण्णांनी स्त्रियांच्या उन्नतीसाठी आपले आयुष्य अर्पण केले होते. हे कार्य प्रचंड होते. संस्था चालवायची म्हणजे पैशांची गरज लागते. त्याचबरोबर निःस्पृहपणे, निःस्वार्थी वृत्तीने काम करणारी माणसेही आवश्यक असतात. आपल्या राष्ट्राच्या उद्धाराचे कठीण काम तडीस नेण्यासाठी, स्त्रियांच्या उन्नतीसाठी प्रयत्न करण्यासाठी स्वार्थत्यागी वृत्तीने काम करणारे पुरुषांचे, स्त्रियांचे शेकडो संघ स्थापन व्हावेत असे

अण्णांना वाटे. आपल्या मनातील हे विचार वृत्तपत्राच्या माध्यमातून, लेखातून, व्याख्यानातून ते लोकांपर्यंत पोहचवीत असत. त्यांच्या या विचार मंथनातूनच १९१० साली निष्काम-कर्म-माठाची स्थापना झाली.

मठ शब्द ऐकल्याबरोबर आपल्याला वाटते की स्वतःचा व जगाचा संसार सोडून, भगवे वस्त्र धारण करून भजन पूजनाला, लागणाऱ्या आणि इतरांनांही याच मार्गाने जावे असा उपदेश करणाऱ्या लोकांची संस्था. अण्णांच्या मठाची कल्पना मात्र फारच उदात्त होती. समाजाची सेवा हीच ईश्वराची सेवा अशी श्रद्धा बाळगून कोणत्याही फलाची अपेक्षा न करता निःस्वार्थ बुद्धीने कर्म करीत रहायचे. "कर्म म्हणजे काम" एवढा संकुचित अर्थ अण्णांना अभिप्रेत नव्हता. कर्म या शब्दाचा अर्थ स्पष्ट करताना अण्णा म्हणत, "मी, माझी बायको, माझी मुले हा मर्यादित विचार विसरून जाऊन परोपकारी वृत्तीने समाजोपयोगी कामे करावयाची."

- समाजहितासाठी झटणाऱ्या हिंदी सेविकांचा संघ निर्माण करणे.
- स्त्रियांसाठी शाळा चालविणे. शिक्षणाची, दयाधर्माची कामे करणे.
- अशा प्रकारची कामे करणाऱ्या इतर संस्थांना शक्तीनुसार मदत करणे. अशी मठाची उद्दिष्टे अण्णांनी ठरविली होती.

स्वार्थत्यागाच्या भट्टीतून तावून सुलाखून निघालेली माणसे मठाचे सेवक सेविका होण्यास योग्य मानली जात. सेवकांसाठी काही नियम निश्चित केले होते.

- आपले जीवन संस्थेच्या कार्यासाठी अर्पण करीन.
- खाजगी फायदा करून घेणार नाही.
- वर्तन शुद्ध ठेवीन. साधी राहणी, साधा पोशाख वापरीन.




- इतरांच्या धार्मिक समजुतीबद्दल उदारपणा ठेवीन.
- कोणाचाही द्वेष करणार नाही.
- अशी प्रतिज्ञा घ्यावी लागे.

अण्णांना वाटे अधिक शिकलेल्या व कमी शिकलेल्या सेवक-सेविकांनी एकमेकांना कमी-अधिक न लेखता समभावाने वागून आपल्या अंगच्या गुणांचा संस्थेला फायदा करून द्यावा. इतकेच नव्हे तर काही स्त्रियांनी दागिने न घालण्याचा संकल्प करून इतरांना उदाहरण घालून देण्याचा प्रयत्न करावा. या कामी होणारी बचत स्वतःचा संसार सुधारण्यासाठी आणि समाज कार्याच्या कामी लावावी.

लोकांसाठी निष्काम बुद्धीने तन मन धन अर्पण करणारे कार्यकर्ते या संघातून निर्माण व्हावेत ही अण्णांची अपेक्षा होती.

निष्काम कर्म मठाचे ध्येय फार उच्च होते. निष्ठेने, सातत्याने, परोपकारासाठी देह झिजवायचा आणि फळांची अपेक्षा करायची नाही हे काम फार कठीण होते. ते सर्वसामान्य माणसाला पेलणारे नव्हते. म्हणूनच मठ फार काळ क्रियाशील राहू शकला नाही. पुढे आश्रम, मठ आणि विद्यालय मिळून महिलाश्रम ही नवीन संस्था निर्माण झाली. त्या वेळी अण्णा म्हणाले, "या त्रिवेणी संगमाच्या कार्याचे महत्त्व वाढो. या तीर्थस्थानापासून बाहेर पडणाऱ्या हजारो मानसकन्या स्वतःचा व मातृभूमीचा उद्धार करण्यास सहाय्यभूत ठरोत." निष्काम कर्म मठातील सेविकांना अण्णांनी लिहिलेले पत्र त्यांच्या संस्थेविषयीच्या तळमळीची साक्ष देते.

## ‘आजन्म सेविकांस’







## हिंदुस्थानातील पहिले महिला विद्यापीठ

अण्णांच्या आयुष्यात अनेकदा असे अकल्पित योग आले की त्यामुळे त्यांच्या कार्याला निराळी दिशा मिळाली. १९१५ सालच्या ऑगस्ट महिन्यातील गोष्ट. अण्णा नेहमीप्रमाणे आश्रमाचे काम करीत बसले होते. त्या दिवशीचे टपाल आले. त्यात एक बुकपोस्ट होते. जपान वुमेन्स युनिव्हर्सिटीचे छोटेसे पुस्तक होते. ते वरवर चाळून विशेष लक्ष न देता अण्णांनी ते तसेच ठेवून दिले. तीन चार आठवड्यांनी एक अकल्पित घटना घडली. सामाजिक परिषदेचे सेक्रेटरी न्यायमूर्ती चंदावरकर यांचे अण्णांना पत्र आले. त्या वर्षीची राष्ट्रीय सामाजिक परिषद मुंबईला भरणार होती. त्या परिषदेचे अध्यक्षस्थान अण्णांनी स्वीकारावे अशी विनंती त्यांनी पत्रात केली होती. हे फारच जबाबदारीचे काम होते. आपल्याला ते जमणार नाही असा विचार करून अण्णांनी ताबडतोब नकार कळवून टाकला. पण न्यायमूर्तींनी नकार लक्षात न घेता अण्णांच्या मित्राला सांगून ते निमंत्रण स्वीकारणे भाग पाडले. अण्णांना प्रश्न पडला. कानाकोपऱ्यात काम करणारा मी सामान्य माणूस. या भव्य राष्ट्रीय परिषदेला अध्यक्ष म्हणून काय बोलणार? त्यांनी बराच विचार केला आणि ठरविले स्त्रीशिक्षण याच विषयावर बोलायचे. अचानक त्यांना त्या दिवशीच्या बुकपोस्टची आठवण झाली. ते पुस्तक ताबडतोब शोधून त्यांनी वाचून टाकले आणि काय आश्चर्य ! अण्णांच्या मनात अवर्णनीय उत्साह ओसंडून वाहू लागला. त्या विद्यापीठाचा अभ्यासक्रम त्यांना एकदम पसंत पडला. जपानी लोकांनी ज्या मार्गाचा स्वीकार केला तसाच मार्ग आपण स्वीकारला तर स्त्रियांमधून माध्यमिक व उच्च माध्यमिक व उच्च शिक्षणाचा प्रसार वेगाने करता येईल, अशी त्यांची खात्री पटली.

जपानसारखे आपल्या देशातही महिला विद्यापीठ स्थापन करण्याचा विचार अण्णांच्या मनात घोळू लागला. ३० डिसेंबर १९१५ रोजी अण्णांनी राष्ट्रीय, सामाजिक परिषदेचे अध्यक्ष म्हणून केलेल्या भाषणात महिला विद्यापीठासंबंधीचे विचार लोकांसमोर मांडले.

स्त्रियांच्या नैसर्गिक प्रवृत्ती, आवडीनिवडी लक्षात घेऊन राष्ट्राच्या अभ्युदयासाठी झटण्याची पात्रता आणून देणारे विश्वविद्यालयीन शिक्षण देण्याची आवश्यकता त्यांनी प्रतिपादन केली. आपले विचार सर्वांपर्यंत पोहोचविण्यासाठी त्यांनी हिंदुस्थानभर दौरे काढले. अण्णांच्या या कार्यात श्रीमती कृष्णाबाई ठाकूर, श्रीमती वेणूबाई नामजोशी, श्रीमती पार्वतीबाई आठवले यांनी खूप मदत केली. या विद्यापीठाबद्दल समाजातील सर्व थरांतून वेगवेगळ्या प्रतिक्रिया उमटल्या. विरोध करणारे लोक भेटले तसेच मदत करणारेही भेटले. अल्पावधीतच अण्णांच्या महिला विद्यापीठाच्या कल्पनेला मूर्त स्वरूप प्राप्त झाले.

दि. ३ जून १९१६ रोजी महिला विद्यापीठाची स्थापना झाली. त्याचे 'भारतीय महिला विद्यापीठ' असे नाव ठेवण्यात आले. महाराष्ट्रासाठी मातृभाषेतून सर्व विषयांचे ज्ञान महिलांना करून देणारी हिंदुस्थानातील ही स्त्रियांची पहिली युनिव्हर्सिटी होती.

या विद्यापीठाचे पहिले कुलगुरू सर रामकृष्णपंत भांडारकर झाले. उपकुलगुरू रँ. र. पु. परांजपे यांची निवड झाली. अण्णासाहेब कर्वे विद्यापीठाचे रजिस्ट्रार झाले. महिलांसाठी स्वतंत्र विद्यापीठाचे अण्णांचे स्वप्न साकार झाले. विद्यापीठाचा आगळावेगळा अभ्यासक्रम तयार करण्यात आला. प्रपंचशास्त्र, आरोग्यशास्त्र, इंद्रियविज्ञान, शिशुमानसशास्त्र, वनस्पतिशास्त्र, गायन, वादन, चित्रकला या विषयांचा अभ्यासक्रमात अंतर्भाव करण्यात आला. मातृभाषेतून शिक्षण हे या विद्यापीठाचे वैशिष्ट्य होते. रवींद्रनाथ टागोरांनीसुद्धा या कल्पनेचे कौतुक केले. म. गांधी पुण्यात आले असता अण्णांनी त्यांची गाठ घेतली. विद्यापीठाच्या अभ्यासक्रमाची माहिती सांगितली. त्यांनाही हा अभ्यासक्रम पसंत पडला. गांधींचा पाठिंबा मिळाला याचा अण्णांना अतिशय आनंद झाला. अहमदाबाद येथे अण्णांचे म. गांधींच्या अध्यक्षतेखाली स्त्रियांच्या युनिव्हर्सिटीसंबंधी व्याख्यान झाले. गांधींजींच्या पाठिंब्यामुळे तेथे बरीच वर्गणी जमली.



ठिकठिकाणी व्याख्याने देऊन अण्णा महिला विद्यापीठाची गरज समजावून देत होते. अहमदाबाद, मद्रास, बंगलोर, दिल्ली, जालंदर, कलकत्ता वगैरे ठिकाणी जाऊन त्यांनी विद्यापीठाचा प्रचार केला. या विद्यापीठाचे पहिले कॉलेज म्हणजे 'महिला पाठशाला' ५ जुलै १९१६ रोजी हिंगणे येथेच सुरू झाले.

सुरुवातीला पहिल्या वर्षाच्या ५ मुली होत्या. अद्याप सरकारकडून विद्यापीठाला मान्यता नव्हती. समाजाकडून हवा तसा प्रतिसाद नव्हता. विद्यापीठाची आर्थिक ओढाताण खूप होत होती. लोकांनी दिलेल्या देणग्यांच्या आधारावर सर्व कारभार चालला होता. पहिली दोन/चार वर्षे विद्यापीठाची फारशी प्रगती झाली नाही. अचानक विद्यापीठाला उदार देणगी मिळाली.

विठ्ठलदास ठाकरसी हे दानशूर उद्योगपती होते. स्त्रियांच्या शिक्षणाबद्दल त्यांना विशेष आस्था होती. १९१९ मध्ये ते जगप्रवासाला गेले असताना त्यांनी जपानच्या टोकियो महिला विद्यापीठाला भेट दिली होती. तेथील कामकाज पाहून ते प्रभावित झाले होते. या प्रवासात त्यांच्या पत्नी लेडी ठाकरसी यांच्या सोबतीसाठी अण्णांच्या विद्यापीठातील विद्यार्थिनी सीताबाई अण्णिगेरी याही आल्या होत्या. त्यांच्याकडून अण्णांनी सुरू केलेल्या विद्यापीठाची माहिती ठाकरसींना समजली. सर विठ्ठलदास ठाकरसी यांनी १५ लाख रुपये भरघोस देणगी अण्णांच्या विद्यापीठाला दिली. विद्यापीठाला ठाकरसी यांच्या आईचे नाव दिले. 'श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी भारतवर्षीय विद्यापीठ' या नावाने विद्यापीठ ओळखले जाऊ लागले. विद्यापीठाच्या कार्याची लोकप्रियता हळूहळू वाढू लागली.

आता अण्णांनी विद्यापीठाच्या धोरणाने चालणाऱ्या शाळा चालविण्याचे प्रयत्न सुरू केले. १९१८ साली अण्णांचे सहकारी मित्र श्री. गो. म. चिपळूणकर यांनी पुण्यात कन्याशाळा सुरू केली होती. नंतर

हिंगण्याचे कॉलेज व ही शाळा विद्यापीठाकडे देऊन दोन्ही शाखांना श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी यांचे नाव देण्यात आले.

## मुलींच्या स्वतंत्र शाळा

सातान्यात मुलींच्या शिक्षणाची स्वतंत्र सोय नव्हती. तेथील काही मंडळींच्या मनात हिंगण्याच्या विद्यापीठाच्या धोरणाची शाळा सातान्यात सुरू करावी असे वाटत होते. श्री. वाग्भट देशपांडे, श्री. पंढरीनाथ घाणेकर यांनी याबाबत पुढाकार घेऊन अण्णांना सातारला बोलावले, त्यांच्याशी चर्चा केली. त्या वेळी श्रीमती कमलाबाई देशपांडे अण्णांबरोबर आल्या होत्या. सातान्यात मुलींची शाळा सुरू करावी व त्याची जबाबदारी कमलाबाईंनी स्वीकारावी असे अण्णांनी सुचविले. लगेचच २२ ऑक्टोबर १९२२ ला भाऊबीजेच्या शुभमुहूर्तावर शाळेचा प्रारंभ झाला. प्रारंभी या शाळेत सहा/सात मुली होत्या. अण्णांच्या प्रेरणेने स्थापन झालेली ही शाळा आर्थिक अडचणींमुळे स्थानिक मंडळींनी १९३५ साली अण्णांच्या म्हणजे हिंगणे स्त्री शिक्षण संस्थेच्या ताब्यात दिली. १९२४ साली अण्णांनी वाईला एक सभा घेतली. मुलींच्या शिक्षणाचे महत्त्व पटवून देताना मुलींसाठी वाईत स्वतंत्र शाळा सुरू करण्याचे आवाहन त्यांनी लोकांना केले. त्या वेळी सनातनी लोकांनी त्यांना विरोध केला. मात्र १९२५ साली वाईतील निवृत्त न्यायाधीश श्री. बापूसाहेब काथवटे, श्री. बापूसाहेब दातार यांनी पुढाकार घेऊन वाईमध्ये कन्याशाळा सुरू केली. श्रीमती शारदाबाई साठे यांनी प्रारंभी या शाळेची जबाबदारी स्वीकारली होती. १९४९ पर्यंत स्थानिक मंडळींनी ही शाळा चालविली. पुढे आर्थिक स्थैर्यासाठी अण्णांच्या हिंगणे स्त्री-शिक्षण संस्थेच्या ताब्यात ही शाळा दिली.

महिला विद्यापीठात पदवीधर झालेल्या श्रीमती बनुताई अहो यांनी बेळगावला मुलींची शाळा सुरू केली. याप्रमाणे सांगली, रत्नागिरी, मुंबई, सुरत, मालवण, बडोदा, अहमदाबाद अशा अनेक ठिकाणी स्थानिक



लोकांच्या मदतीने अण्णांच्या प्रोत्साहनाने मुलींच्या शाळा, महाविद्यालये सुरू झाली.

## त्रिखंडाचा प्रवास

महिला विद्यापीठाची स्थापना केल्यानंतर सुमारे १२ वर्षे म्हणजे १९२८ पर्यंत अण्णांनी भारतातील बहुतेक सर्व प्रांतांत भ्रमंती करून विद्यापीठासंबंधी लोकमत जागृत केले होते. हजारो रुपयांची मदत मिळवून आणली होती. आता त्यांच्या मनात विचार आला, भारताबाहेरच्या इतर मोठमोठ्या देशांत जाऊन विद्यापीठाच्या कामाचा प्रचार करावा. या वेळी खरं तर अण्णांची सत्तरी उलटली होती. मात्र पूर्वीच्याच उमेदीने ते काम करीत होते. कंटाळा, विश्रांती हे शब्द त्यांच्या कोषातच नव्हते.

१६ मार्च १९२९ रोजी अण्णा मुंबईहून बोटीने इंग्लंडला जाण्यास निघाले. इंग्लंडमध्ये, विशेषतः लंडनमध्ये कितीतरी प्रेक्षणीय ठिकाणे होती. पण अण्णा मात्र संस्थेच्या कार्यात मग्न होते. तेथील वेगवेगळ्या संस्थांत जायचे, सभा भरवायच्या, जी काही माणसे येतील त्यांना कधी तोंडी तर कधी मॅजिक लँटर्नच्या साहाय्याने १५/२० मिनिटे माहिती सांगायची आणि वर्गणी मागायची. तिथे त्यांनी शैक्षणिक, सामाजिक संस्थांना भेटी दिल्या. दोन आंतरराष्ट्रीय संमेलनांना ते हजर राहिले. ब्रिटनमध्ये लंडन, ऑक्सफर्ड, केंब्रिज, मँचेस्टर, एडिंबरो, लिड्स वगैरे दहा बारा शहरांना भेटी दिल्या. तीस/पस्तीस व्याख्याने दिली. नामांकित विद्यापीठांना भेटी देऊन प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञांशीही चर्चा केली. लंडन येथील काम संपवून अण्णा यूरोपातील इतर देशांकडे वळले.

अण्णांचा पॅरिसमधील मुक्काम कामाच्या दृष्टीने बराच फायद्याचा ठरला. बऱ्याच देणग्या मिळाल्या. नंतर ते बेल्जियम व हॉलंड देशात गेले. तेथून स्वित्झर्लंडमधील जीनिव्हा शहरी शिक्षक संघाच्या संमेलनासाठी हजर राहिले. जगातील निरनिराळ्या देशांतून दीड हजार प्रतिनिधी आले

होते. भारतातून १५ प्रतिनिधी गेले होते. त्यांनी अण्णांनाच आपले प्रमुख नेमले. जगातील प्रमुख शिक्षणतज्ज्ञांच्या ओळखी झाल्याने अण्णांची, त्यांच्या कार्याची प्रतिष्ठा वाढली. स्वित्झर्लंडमध्ये सात आठ दिवस राहून अण्णा डेन्मार्कमधील शिक्षकसभेला गेले. या संमेलनासाठी विविध देशांतील दोन हजार प्रतिनिधी आले होते. डाल्टन प्लॅन पद्धतीचा उपक्रम करणाऱ्या हेलन पार्खर्स्ट व पूर्व प्राथमिक शिक्षणपद्धती लोकप्रिय करणाऱ्या मादाम मॉंटेसरीबाई या जगन्मान्य शिक्षणतज्ज्ञांशी प्रत्यक्ष गाठीभेटी झाल्या.

एका सभेत अण्णा आणि कमलादेवी चट्टोपाध्याय यांची भाषणे झाली. अण्णा नंतर कोपनहेगनला गेले. डेन्मार्क, स्वीडन, नॉर्वे येथे व्याख्याने देऊन जर्मनीला गेले. तेथे असताना अण्णांनी सुप्रसिद्ध वैज्ञानिक श्री. आइनस्टाइन यांची भेट घेतली. या दोघांच्या भेटीचा फोटो न्यूयॉर्क टाइम्समध्ये प्रसिद्ध झाला. आइनस्टाइन यांच्या फोटोखाली पाश्चात्त्य देशातील जगविख्यात शास्त्रज्ञ आणि अण्णांच्या फोटोखाली पौर्वात्य देशातील जगविख्यात शिक्षणतज्ज्ञ असे लिहिले होते. जर्मनीतही अण्णांनी तीन चार व्याख्याने दिली आणि जर्मन देश सोडला. त्यांनी यूरोपचा दौराही संपविला. या दौऱ्यात पाच महिन्यांत त्यांनी सुमारे ५० शहरांना भेटी दिल्या. तेवढीच व्याख्याने दिली. ४० शिक्षणसंस्था पाहिल्या. सुमारे साडेबारा हजार रुपयांची मदत मिळविली.

आता अण्णांना जपानला जायचे होते. तिथली महिलांची युनिव्हर्सिटी पाहण्याची त्यांना खूप उत्सुकता होती. जाताना अमेरिकेला जावे या विचाराने ते न्यूयॉर्कला आले. तेथे राहून आसपासच्या दहा-बारा गावांतील संस्था पाहून तेथे त्यांनी व्याख्याने दिली. फिलाडेल्फिया, वॉशिंग्टन, पिट्सबर्ग, शिकागो, लॉस एंजेल्स, सॅनफ्रॅन्सिस्को वगैरे शहरात ते हिंडून आले. अमेरिकेतील प्रवासात २००० डॉलर्सची वर्गणी जमा झाली.



दि. ७ जानेवारी १९३० रोजी अण्णा जपानच्या याकोहामा बंदरात उतरले. टोकियोतील वुमेन्स युनिव्हर्सिटी हे तर त्यांचे स्फूर्तिस्थान ! याचे दर्शन घडणार या भावनेने त्यांच्या अंतःकरणात आनंदाच्या ऊर्मी उसळत होत्या. अण्णांच्या ध्येयवादाला मूर्त स्वरूप देणारे हे स्फूर्तिस्थान असल्याने अण्णा भाविक भक्तासारखे त्याच्या दर्शनाला उत्सुक होते. या विश्वविद्यालयातील अभ्यासक्रम, विविध सुविधा पाहून अण्णा प्रभावित झाले. टोकियो येथे दहा दिवस राहून, बरीच वर्गणी जमवून कोबे या गावी गेले. चीनहून फिलिपीन्स, मॅनिला, जावा बेटातील सुरबाया या देशातून अण्णा मलाया, सिंगापूरला रवाना झाले. तेथे दहा दिवस राहून आणि आपल्या कार्याचा प्रचार करून तेरा महिन्यांनी पुण्यात परत आले. या त्रिखंडाच्या प्रवासात २७ हजार रुपये वर्गणी जमली. या त्यांच्या प्रवासामुळे, प्रचारकार्यामुळे विद्यापीठाने चालविलेल्या शैक्षणिक कार्याची, इतर सामाजिक कार्याची खरीखुरी माहिती त्या त्या ठिकाणच्या लोकांना झाली. सर्व प्रवासात यूरोप, अमेरिका येथील निरनिराळ्या सामाजिक, शैक्षणिक संस्थांनी अण्णांना अनेक प्रकारे मदत केली. वर्तमानपत्रकारांनी त्यांच्या कार्याला प्रसिद्धी दिली. त्यांचे काम सोपे केले.

यूरोप, अमेरिका, आशिया असा त्रिखंडाचा प्रवास करून त्यांनी थोडी विश्रांती घेतली. पण विश्रांतीच्या नावावर स्वस्थ बसणे त्यांना जमेना. आता वर्गणीसाठी कोठे जावे असा विचार मनात सुरू झाला. अण्णांनी ठरवले आता आफ्रिकेत जायचे. परदेश दौऱ्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढला होता. शिवाय त्यांचे चिरंजीव डॉ. शंकरराव कर्वे हेही आफ्रिकेत होते. त्यामुळे वयाची पर्वा न करता आपली पत्नी आनंदीबाई समवेत ते ३१ डिसेंबर १९३० रोजी आफ्रिकेला निघाले.

आफ्रिकेत अण्णांचा मुक्काम त्यांच्या चिरंजीवांकडे मोंबासा येथे होता. युगांडा, झांझिबार, टँगेनिया येथे चार महिने काम करून दरबान, फिनिक्स, जोहन्सबर्ग, प्रिटोरिया वगैरे मोठ्या शहरांना भेटी देऊन

१२ मार्च १९३२ ला ते परत मुंबईला आले. या दौऱ्यात दोन हजार लोकांच्या गाठीभेटी घेऊन त्यांनी संस्थेसाठी रु. ३४००० रुपये मिळविले.

## महाराष्ट्र-ग्राम-प्राथमिक शिक्षण संघ

१९३६ साली विद्यापीठाच्या जबाबदारीतून थोडे मोकळे झाल्यावर महाराष्ट्र ग्राम-प्राथमिक शिक्षणाच्या कल्पनेने अण्णांच्या मनाचा कब्जा घेतला. या वेळी अण्णा ७८ वर्षांचे होते. जीवनातील या वेळी खरं म्हणजे स्वस्थ बसून आनंदाने, कौतुकाने नातवंडांच्या बाललीला, मुलामुलींचे संसार पाहत बसण्याचा, वृद्ध प्रेमळ आजोबा, वत्सल पिता अशा भूमिका साकार करण्याचा काळ, पण दिवसाचा सगळा वेळ असा प्रपंचात घालवावा एवढी आसक्ती त्यांना नव्हती. शिवाय या वयातही आणखी काम करण्याची धमक त्यांच्या अंगात होती. एक काम मार्गी लागल्यावर दुसरे उपयुक्त कार्य हाती घ्यायचे हा तर त्यांचा स्वभावधर्मच होता. आश्रम, विद्यापीठ यांचा फायदा विशेषकरून शहरातील पांढरपेशा वर्गातील लोकांनाच जास्तीत जास्त मिळाला अशी टीका अण्णांच्या कानावर येत होती. मग अण्णांनी ठरवले की खेडेगावातील मुलामुलींच्या शिक्षण-प्रसाराचा एक नवीन उपक्रम सुरू करायचा.

त्या वेळी परकीय सरकारच्या आमदानीत शिक्षण सक्तीचे होऊन लहानसहान खेड्यापर्यंत पोहोचण्यास कित्येक दशके लागतील असे स्पष्ट दिसत होते. तेव्हा स्वावलंबनाने खेड्यांनीच स्वतःचा प्रश्न स्वतःच सोडविल्याशिवाय गत्यंतर नव्हते. एखादा उत्साही शिक्षक खेड्यात गेला, खेड्यातील लोकांनी थोडी वर्गणी जमवून थोडाफार पगार दिला तर एखाद्या मध्यवर्ती संस्थेच्या थोड्याशा मदतीने लहानशा खेड्यातही शाळा चालू शकतील अशी योजना अण्णांच्या मनात घोळत होती.

कोणतीही चांगली कल्पना मनात फार काळ तशीच पडू द्यायची नाही, तशी पडू दिल्यास भलभलते फाटे फुटून ती विरून जायची भीती



असते. म्हणून ती ताबडतोब सार्वजनिकरीत्या प्रसिद्ध करून टाकायची म्हणजे ती कल्पना कृतीत उतरवण्याची जबाबदारी आपणांवर आपोआपच पडते अशी अण्णांची विचारसरणी होती. त्याप्रमाणे अण्णांनी ही नवी कल्पना डिसेंबर १९३५ च्या केसरीत एक लेख लिहून प्रसिद्ध करून टाकली.

या लेखात निदान एका तरी खेड्यात शाळा चालविण्याचा व त्याकरिता आपल्या स्वतःच्या अगदी वेताच्या पेन्शनमधून दरमहा रु. १५/- देण्याचा संकल्प त्यांनी जाहीर केला.

१९३६ मध्ये त्यांनी 'महाराष्ट्र ग्राम प्राथमिक शिक्षण मंडळ' या नावाची संस्था काढली. साहित्यसम्राट श्री. न. चिं. केळकर हे तिचे अध्यक्ष होते. ज्या गावात बोर्डाची शाळा नसेल तेथे शाळा काढण्यासाठी मदत देणे हा या संस्थेचा उद्देश होता. अवघ्या दोन वर्षांत सुमारे ७,८१८ रुपये एवढे जमले. या मंडळाचे कार्य अकरा वर्षे चालले.

१९४७ साली आपल्याला स्वातंत्र्य मिळाले. आपल्या सरकारने याच शाळांना मदत देण्याचे ठरविले. मग अशा मंडळाची गरज उरली नाही.

## समता संघ

माणसाने निर्माण केलेली आर्थिक, सामाजिक, धार्मिक, कृत्रिम बंधने नष्ट करून समाजात खऱ्या अर्थाने समता नांदावी असे अण्णांना सारखे वाटत असे. अण्णा स्वतः जातिभेदाविरुद्ध होते. समाजात समतेच्या तत्त्वाचा प्रसार कसा करावा यासंबंधी त्यांचे विचारमंथन चालू असे. फेड्रिक जेम्स गुल्ड यांच्याशी अण्णांचा इंग्लंडमध्ये परिचय झाला होता. तेथे त्यांनी 'मानवी समता पुरस्कार मंडळ' नावाची संस्था काढली होती. त्यावरूनच अण्णांना समता संघाची कल्पना सुचली. या संदर्भात त्यांनी मद्रासच्या इंडियन रिव्ह्यूमध्ये या विषयावर लेखही लिहिला. शेकडो विचारवंतांशी चर्चा केल्यानंतर २१ एप्रिल १९४४ रोजी 'समता

संघ' या संस्थेची स्थापना केली. या संघातर्फे 'मानवी समता' या नावाचे वृत्तपत्र सुरू करण्यात आले. या संघाचे हजारो सभासद झाले. समता संघाने जातिभेद नष्ट करण्याचे, सामाजिक, धार्मिक क्षेत्रात समता प्रस्थापित करण्याचे काम केले.

जातिभेद, अस्पृश्यता यामुळे पोखरल्या गेलेल्या भारतीय समाजाला नवचैतन्य आणण्यासाठी जाती-निर्मूलन संस्था, समता संघ अशा संस्थांना जन्म देणारा लोकनेता या नात्याने अण्णांचे हे कार्य मोलाचे आहे. जाती निर्मूलन कार्याकरिता अण्णांनी धडाडीने पुढाकार घेतला. सनातनी मंडळींना त्यांनी अकारण दुखावले नाही. प्रत्येकाकडे जाऊन त्यांनी सहानुभूती व मिळालेली मदत स्वीकारली. अण्णांचा ९१ वा वाढदिवस डॉ. जयकर यांच्या अध्यक्षतेखाली पुणेकरांतर्फे थाटात संपन्न झाला. १०० संस्थांतर्फे त्यांना संयुक्त मानपत्रही देण्यात आले. या सभेत सत्काराला उत्तर देताना सुद्धा अण्णांच्या भाषणात त्यांच्या ध्यानीमनी वसत असलेले समतेचे विचारच प्रकट झाले. ते आपल्या भाषणात म्हणाले, ''आपणाला मिळालेले स्वातंत्र्य टिकवायचे असेल तर आपल्या हाडीमाशी खिळलेला जातीयवाद आपण मिटवला पाहिजे. हा आपला बिकट प्रश्न आहे तो आपण सोडवलाच पाहिजे. यामुळे समाजाचीच नव्हे तर देशाची हानी होणार आहे. जातीयवादाच्या मुळाशी धार्मिक भावना व रूढीचे बंधन असल्याने त्या नष्ट करण्यासाठी रोटी बेटी व्यवहार सर्रास सुरू झाला पाहिजे. धर्म हा परिवर्तनीय आहे ही समजूत पटवून देऊन हा जातीयवाद नष्ट केला तरच पुढील काळात तरणोपाय आहे.'' अर्धशतकापूर्वीचे अण्णांचे हे विचार त्यांचे द्रष्टेपण तर दाखवतातच पण आजच्या काळातही ते मार्गदर्शक ठरतात.

न्या. रानडे यांनी सुरू केलेल्या सामाजिक परिषदेचे अधिवेशन १९२८ नंतर भरलेच नव्हते. १८ एप्रिल १९५३ रोजी या परिषदेचे अधिवेशन झाले या वेळी सुद्धा उद्घाटनपर भाषणात ते म्हणाले, ''देश पारतंत्र्यातून स्वतंत्र झालेला पाहिला पण दुर्दैवाने एक गोष्ट मात्र प्राप्त



झाली नाही, ती म्हणजे सामाजिक समता. ती लाभल्याखेरीज स्वातंत्र्याची गोडी चाखता येणार नाही. आम्हाला जर स्वराज्याचे सुराज्य बनवायचे असेल तर सामाजिक समता अगोदर प्रस्थापित करून घेतली पाहिजे. तिच्याशिवाय आर्थिक समता व राजकीय सत्ता उपभोगता येणार नाही. मी जाती निर्मूलन हे सामाजिक परिषदेचे महत्त्वाचे अंग समजतो. आपल्या पुरोगामी तत्त्वज्ञान ग्रंथात सांगितलेला सर्वभूतहितवाद हेच आमचे आजचेही ध्येय असले पाहिजे. 'सर्वोदय' हे त्याचे आधुनिक नाव मी समजतो.'' अण्णांचे हे तत्त्वज्ञान आचरणात आणण्याची आजच्या काळात नितांत गरज आहे.

## परमेश्वर सृष्टीहून वेगळा नाही

परमेश्वर सृष्टीहून वेगळा नसून तो प्राणिमात्रांत वास करतो असे अण्णांचे मत होते. परमेश्वराची पूजाअर्चा, जपजाप्य, प्रार्थना, भजन-कीर्तन या गोष्टींकडे अण्णांचे मन कधी वळले नाही. मात्र साधुसंतांच्या ग्रंथातील नीती, वैराग्य-परोपकार अशा गोष्टी वाचून त्यांचे मन उचंबळून येई. मनुष्य आस्तिक असो वा नास्तिक असो. त्याचे या जगतातील जीवन अत्यंत बहुमोल असते. त्याचा उपयोग अतिशय शहाणपणाने, दूरदर्शीपणाने केला पाहिजे. आपल्या आचरणाला दिशा लावण्याचा प्रयत्न मनुष्य करू लागला तर त्याला नवजीवन प्राप्त होईल. आत्मपरीक्षण हा आत्मोन्नतीचा श्रेष्ठ मार्ग आहे असे अण्णा आवर्जून सांगत. आपले, आपल्या कुटुंबाचे कल्याण करण्याचे विचार प्रत्येकाच्या मनात जरूर आले पाहिजेत. मात्र स्वतःच्या कल्याणासाठी झटत असताना दुसऱ्यांच्या कल्याणाची काळजीही आपण केली पाहिजे. केवळ स्वार्थापलिकडे ज्यांची नजर कधी जात नाही अशी माणसे कितीही धार्मिक असली तरी ती खऱ्या अर्थाने धर्म पाळत नाहीत असे अण्णांचे मत होते.

स्वतःच्या प्रगतीबरोबर दुसऱ्याच्या उन्नतीसाठी आपण धडपड करू लागलो तर ती गोष्ट लगेच साध्य होईल असे नाही पण प्रामाणिक प्रयत्न करणे हे तर आपल्या हातात असते ना ? टिटवीने ज्याप्रमाणे आपल्या चोचीतून थेंबथेंब पाणी बाहेर टाकून समुद्र आटवायचा प्रयत्न केला त्याप्रमाणे आपला हा प्रयत्न आहे अशी खूणगाठ मनाशी बांधावी म्हणजे निराश होण्याचे कारण नाही असे अण्णा म्हणत.

अण्णांच्या मते धर्म, तत्त्वज्ञान, नीती या सर्वांचीच खिचडी धर्माच्या रूढ कल्पनेत झाली आहे. खरे तर या वेगवेगळ्या गोष्टी आहेत. सनातन सत्य कोणते ते शोधून काढण्याचे मार्ग कोणते, ईश्वर आहे की नाही या सर्व गोष्टींचा स्वतंत्रपणे विचार करण्याची मोकळीक प्रत्येक व्यक्तीला असली पाहिजे. समाजातील रूढीचे दडपण व्यक्तीवर आले तर स्वातंत्र्याविषयीची वाटच खुंटून जाईल असे त्यांना वाटे.

अण्णा म्हणत, ''जुने जसेच्या तसे सांभाळून ठेवण्यात अर्थ नाही. जुन्या-नव्यांचा संगम होऊन जुन्यातून नवे उत्क्रांत होणे हीच जुन्याची खरी वाढ आहे.''

कोणतेही धर्मपुस्तक ईश्वरप्रणित नाही. कोणतीही व्यक्ती ईश्वरी अवतार नाही असे अण्णांचे मत होते. ते म्हणत असत, असे मत असणारे लोक आपल्या बहुमोल धर्मपंथांचा, आदरणीय विभूतींचा अनादर करतात असे मानू नये. एखाद्या मुलाचे काही बाबतीत आपल्या आई-वडिलांशी मतभेद होऊ शकतात. पण तरीही त्या मुलाच्या मनात आपल्या मातापित्यांबद्दल पूज्यबुद्धी असतेच ना ? जगात जे सत्पुरुष होऊन गेले ते वंद्य, अनुकरणीय जरूर मानावेत पण परमेश्वराशी त्यांचा इतका जवळचा संबंध लावावा हे अण्णाना पटत नसे. अमुक धर्माच्या, संप्रदायाच्या लोकांतच चांगली माणसे मिळतात असे नाही. सर्व प्रकारच्या जातीधर्मांत, अस्तिक-नास्तिकतेचा पुरस्कार करणाऱ्या लोकांत सत्पुरुष निर्माण झाले आहेत.



''माणसाची किंमत त्याच्या मनावर नव्हे तर त्याच्या आचरणावरून ठरते'' असे अण्णा म्हणत असत. त्यांच्या मते राष्ट्रीय ग्रंथ, राष्ट्रीय पुरुष, राष्ट्रीय परंपरा हे सर्व राष्ट्रांचे जीवन होत. पाणी जसे नेहमी वाहते राहून, शुद्ध राखायची खबरदारी घ्यावी लागते त्याचप्रमाणे राष्ट्रीय आचार-विचारांना चालना देऊन ते देशकालाशी तुलनीय असे करावे लागतात. पाण्याचा उपसा बंद झाला म्हणजे जी स्थिती होते तशी आपल्या राष्ट्रीय आचार-विचारांची होऊ नये यासाठी प्राचीन काळाच्या आचार-विचारांच्या परंपरेत जे श्रेष्ठ, रमणीय आहे ते राखले पाहिजे. बाकीचे हळूहळू बदलत गेले पाहिजे. परंपरेने प्राप्त झालेल्या समजुतींना चिकटून राहणे हे देखील मनुष्याची अवनती करणारे ठरू शकते. समाजाने अंधश्रद्धेला बळी न पडता अनुभवाला पटण्यासारख्या, स्वतःला सत्य वाटणाऱ्या, मतांचे ग्रहण करावे. आपल्या राष्ट्राला नवजीवन प्राप्त होण्यासाठी अशा स्वतंत्र विचारांना वाव देऊन एकमेकांच्या धर्म-विचारांकडे, उदार वृत्तीने, थोर मनाने पाहिले पाहिजे.

सद्भावनेने चाललेल्या सर्व धर्मांत, पंथात आणि तो सद्हेतूने चालविणाऱ्या सर्व व्यक्तींत सत्याचा, चांगुलपणाचा अंश आहे असे मानण्याची उदार वृत्ती आपण बाळगली पाहिजे; यातच आपल्या सर्वांचे आणि राष्ट्राचेही कल्याण आहे अशी अण्णांची मनोधारणा होती.

शंभर वर्षांपूर्वी व्यक्त केलेले महर्षी अण्णासाहेबांचे हे उद्बोधक विचार त्यांच्या द्रष्ट्या, विशाल अंतःकरणाची साक्ष पटवतात. हे विचार आजही दीपस्तंभासारखे मार्गदर्शक ठरतात.

## आनंदाचे डोही आनंद तरंग

परमेश्वर कृपेने अण्णांना दीर्घायुष्य लाभले. त्यांचा केवळ ६१ वा वाढदिवस थाटाने साजरा झाला नाही तर पुढील दहा दहा वर्षांनी म्हणजे ७१, ८१, ९१ आणि १०० वा वाढदिवस सर्व चढत्या क्रमाने, उदंड उत्साहाने साजरे झाले.

१८ एप्रिल १९१८ त्यांचा ६१ वा वाढदिवस. याचे वैशिष्ट्य म्हणजे संस्थेतील सर्व सेवकांनी सामुदायिक प्रार्थनेनंतर अण्णांचा जयजयकार करीत मूळ झोपडीपासून प्रभात फेरी काढली. हिंगण्याच्या माळावर बांधलेल्या प्रत्येक इमारती समोर जाऊन त्या इमारतीची माहिती सांगितली गेली. त्यामुळे संस्थेच्या मागील वीस वर्षांच्या इतिहासाची उजळणी झाली. मान्यवरांच्या उपस्थितीत अण्णांचा भव्य सत्कार, गौरवपर भाषणे झाली.

१८ एप्रिल १९२८ अण्णांचा ७१ वा वाढदिवस. या दिवशीची उल्लेखनीय गोष्ट म्हणजे अण्णाच्या हस्ते संस्थेत काम करणाऱ्या सर्व सेवकांना फेटे, टोप्या देण्यात आल्या. मोलकरिणींचा खणानारळाने ओटी भरून सत्कार करण्यात आला. पुणे महानगरपालिकेतर्फे अण्णांच्या अतुलनीय कार्याबद्दल त्यांचा गौरव करून त्यांना मानपत्र अर्पण करण्यात आले. अण्णांचे हृदयस्पर्शी भाषण झाले. "हिंगण्याचा आश्रम पाहण्यासाठी माझ्या मातोश्री आल्या त्या वेळी मला जसा आनंद झाला तसा आनंद आज माझ्या मातेसमान असलेल्या पुण्यनगरीने माझ्या केलेल्या कार्याच्या कौतुकामुळे मला झाला आहे." अशी सुरुवात करून अण्णांनी या प्रसंगी क्रांतिकारक विचार मांडला. ते म्हणाले, "मुलामुलींना दोघांना शिक्षण देण्यासाठी आपण प्रयत्न करावे पण द्रव्याच्या अभावी दोन्ही गोष्टी शक्य नसतील तर एक वेळ मुलाचे शिक्षण मागे पडले तरी चालेल पण मुलांचे शील संवर्धन करण्याकरिता मातेने सुशिक्षित होणे इष्ट असल्यामुळे मुलींच्या शिक्षणाची योजना लवकरात लवकर करावी." या शुभप्रसंगी आठवण म्हणून महानगरपालिकेने संभाजी पुलाकडून एरंडवण्याकडे जाणाऱ्या रस्त्याला कर्वे रोड असे नांव द्यायचे ठरविले.

१८ एप्रिल १९३८ अण्णांचा ८१ वा वाढदिवस. १९२८-३८ हे दशक अण्णांच्या कर्तृत्वाचे शिखरच. अण्णांनी त्रिखंडाचा प्रवास केला. ग्राम-शिक्षणाचे कार्य हाती घेतले. त्यांच्या प्रेरणेने निघालेल्या विविध



ठिकाणांच्या शाळा आता स्थिरावल्या होत्या, त्यामुळे त्यांचा सत्कारही अनेक ठिकाणी साजरा झाला. दादासाहेब मावळणकर यांच्या अध्यक्षतेखाली हिंगण्याचा कार्यक्रम मुख्यमंत्री बाळासाहेब खेर यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईत झाला. फलटणचे राजे नाईक निंबाळकर यांनी फलटण येथे भावपूर्ण कार्यक्रम करून अण्णांना वार्षिक ६००/- रुपये पेन्शन देण्यास सुरुवात केली. अण्णांनी हे पैसे अर्थातच समाजोपयोगी कार्यासाठी खर्च केले.

१८ एप्रिल १९४८ अण्णांचा ९१ वा वाढदिवस. पुणे येथील सत्कार समारंभ डॉ. जयकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. मुंबई येथील सत्कार समारंभ २६ एप्रिल रोजी राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. "आपण सर्व देशांतर्फे महर्षी कर्वे यांचे अभिनंदन करीत आहोत." असे सांगून राष्ट्रपती म्हणाले, "आपले व्रत पूर्ण झाले. आपल्या दर्शनाने आम्हाला उत्साह वाटतो. हिंदुस्थानात मनुष्य पन्नास-साठ वर्षांपर्यंत जगला की म्हातारा समजला जातो; पण आपल्याकडे पाहिले की आम्हा तरुणांचा उत्साह वाढतो." अण्णा खरोखरच सर्वांना उत्साह देत राहिले. सर्वांच्या "जीवेत् शरदः शतम्" या शुभेच्छा खऱ्या ठरल्या आणि तो शुभमंगल दिवस उजाडलाही मात्र तो शताब्दीचा अपूर्व सोहळा पहायचे भाग्य अण्णांच्या पत्नीला लाभले नाही...

## आश्रमाची आई "बाया"

वयाच्या पंधराव्या वर्षी अण्णांचा राधाबाईशी विवाह झाला. बाई कसली नऊ वर्षांची छोटी मुलगी ती. दोघेही लहानपणी एकत्र खेळले होते. विवाहनंतर प्रपंचाचा डाव मांडला पण तो अर्ध्यावरच सोडून राधाबाई देवाघरी गेली. छोट्या रघुनाथला अण्णांच्या स्वाधीन करून.


"पुनर्विवाह केला तर विधवेशीच करीन" या प्रतिज्ञेप्रमाणे अण्णांनी गोदूबाई या पंडिता रमाबाई यांच्या शारदा सदन मधील विधवेशी विवाह केला. गोदूबाईंचे नांव अण्णांनी "आनंदी" असे ठेवले. पुनर्विवाह केल्यामुळे तत्कालीन समाजाने केलेली उपेक्षा, हेटाळणी, निंदा, नालस्ती, शिव्या-शाप यामुळे होणारे दुःख तिने आनंदाने सोसावे असे अण्णांना वाटले असेल का ?

आनंदी होतीच तशी निग्रही, स्वाभिमानी, करारी, अन् कर्तबगार! ती अत्यंत संसारदक्ष अन् काटकसरी होती. तिचे बोलणे स्पष्ट, परखड, प्रसंगी दुसऱ्यांना बोचणारे वाटे पण त्यात स्वार्थाचा लवलेशही नसे. दुसऱ्याच्या कल्याणाची भावना असे. ती सदैव कामात मग्न असायची.


अण्णांना अगणित कन्यांचे धर्मपिता असा सन्मान मिळाला. त्या कन्यांचे मातृपद आनंदीबाईंनी सांभाळले. ज्यांच्या जीवनात अंधार, फक्त घोर अंधारच होता अशा विधवा, परित्यक्ता, अनाथ बायाबापड्यांनाच नव्हे तर त्यांच्या लेकराबाळांना मायेची सावली दिली ती याच मातेने. त्यांना स्वतःला मुलगी नव्हती. आश्रमातल्या सगळ्या मुली त्यांच्या कन्याच. आईला का कुणी अहो-जाहो म्हणते? सारेजण "बाया" या एकेरी नावानेच तिचा उल्लेख करीत असत. अण्णांबरोबर बायानेही खूप खूप सोसले. तिचे हे सोसणे, सहन करणे सारे सारे तिने "माझे पुराण" या आत्मचरित्रात शब्दबद्ध केले आहे. त्यात केवळ तिच्याच भावना बोलक्या झाल्या आहेत असे नाही तर तत्कालीन समाजाची मनोवृत्ती, रूढी, परंपरा, स्त्रियांकडे विशेषतः विधवांकडे

१९३४ नंतर संस्थेच्या दैनंदिन कार्यापेक्षा समाजातील इतर नव्या समस्यांकडे ते लक्ष देऊ लागले. जातिनिर्मूलन व मानवी समता या कार्याची त्यांना तळमळ वाटे. १९३६ साली महाराष्ट्र ग्राम प्राथमिक शिक्षण मंडळाची स्थापना त्यांनी केली.





५७ वर्षे अण्णांच्या कार्याशी एकरूप झालेली त्यांची सहचारिणी-बाया- २९ नोव्हेंबर १९५० रोजी दिवंगत झाली. १९२८ साली स्थापन झालेल्या शाळेला आनंदीबाई कर्वे प्राथमिक शाळा असे नाव दिले.



बघण्याचा संकुचित दृष्टिकोन यांचे विदारक, हृदयाला भिडणारे चित्र साध्या, सोज्वळ भाषेत रेखाटले आहे. अण्णांनी गोदूबाईंशी लग्न केले तेव्हा उखाण्यात नाव घेतले होते.

*सदनाचे उपकार मजवर झाले फार*
*आनंदीने फेडायला असावे तयार*

आनंदी जन्मभर समाजाने केलेले, न केलेले उपकार फेडतच राहिली. कुणी स्तुती करो अथवा निंदा करो आपल्याला योग्य वाटेल ते काम करीत रहायचे; हा बायाचा स्वभाव. लग्नकार्यात अक्षता टाकताना, ओटी भरताना मांडवभर पडलेले तांदूळ ती गोळा करायची. लोक नावं ठेवायची. तिच्या मनात विचार यायचा अशी नासाडी करण्यापेक्षा गरिबांच्या मुखात पडतील. मूर्तीतल्या देवावर तिचा विश्वास नव्हता पण माणसातल्या देवावर जरूर होता. बाया म्हणायची, ''मी पूजाअर्चा कधी केली नाही, पोथी-पुराणाला देवळात गेले नाही. देवाची भक्ती केल्याने पुण्य मिळते. स्वर्गात चांगली जागा मिळते असे मला वाटत नाही. माझा धर्म म्हणजे पंडिता रमाबाई यांनी शिकविलेला, अनाथ-अपंगांना वाट दाखविण्याचा, अडल्या-नडलेल्यांना मदत करण्याचा, तो मी पाळीत असते.'' खरोखरीच रंजल्या-गांजल्यांची सेवा करण्यात तिला समाधान मिळे.

अण्णांनी कुटुंबाची तरतूद अशी केलीच नव्हती. भविष्यकाळात आपले बरे-वाईट झाले तर उपजीविकेचे साधन असावे अशा हेतूने अण्णांनी बायाला नर्सिंग कोर्ससाठी नागपूरला पाठविले होते. बाया सुईणीचे काम करताना गरिबांची फुकट कामे करीत असे. श्रीमंतांकडून तिला चांगले पैसे मिळायचे. तिला, मुलांना चैनीच्या सवयी नव्हत्या. तिचा स्वभाव काटकसरी होता शिवाय तिला बचतीचीही सवय होती.

ती अण्णांबरोबर आफ्रिकेत गेली होती पण आश्रमाच्या नव्हे तर स्वतःच्या खर्चाने. तिथेही तिने संस्थेसाठी दोन हजार रुपये एवढी भाऊबीज जमविली. ती स्वाभिमानी होती. स्वावलंबी होती. बाया



म्हणायची, ''कर्व्यांनी मला माझा कारभार करू दिला. त्यात ढवळाढवळ केली नाही त्याबद्दल मी वेळोवेळी त्यांचे आभार मानते. कर्वे तसे वागले नसते तर हे स्वतंत्रतेचे दिवस मला दिसले नसते.''

आश्रमात रहात असताना तिने एका खोलीत शेतकऱ्यांच्या मुलांसाठी शाळा चालविली होती. ती पुढे आश्रमाच्या शाळेतच विलीन करण्यात आली. या शाळेसाठी इमारत व्हावी म्हणून तिने साठविलेले बारा-तेरा हजार रुपये संस्थेला दिले. त्या इमारतीला ''आनंदीबाई कर्वे प्राथमिक शाळा'' असे नाव संस्थेने दिले.

बाया म्हणायची पुढच्या पिढीतल्या लेकी-सुना, नातवंडे यांना माझे अनुभवाचे सांगणे आहे, ''नवरा कितीही चांगला असला तरी संसार सुखाचा होण्यासाठी, मुले चांगली शिकण्यासाठी बायकांनीच कंबर कसून उभे रहावे लागते.'' पुनर्विवाह केले त्यांची मुले चांगली होत नाही अशी टीका आपल्याला ऐकावी लागू नये असे तिला सारखे वाटे. आपल्या मुलांना कोणी नावे ठेवू नयेत, त्यांना चांगले शिक्षण मिळावे यासाठी पडतील ते कष्ट करण्याची तिची तयारी होती. बायाला तिच्या तपश्चर्येचे फळ मिळाले. मुले कर्तबगार निघाली.

अण्णांचे थोरले चिरंजीव प्रा. रघुनाथराव कर्वे अण्णांसारखेच ध्येयवादी, करारी, स्वतःला पटणारी तत्त्वे लोकनिंदेची पर्वा न करता निर्भीडपणे सांगणारे होते. स्वतः झीज सोसून त्यांनी कुटुंबनियोजनाचा पुरस्कार, प्रचार केला. ''समाज स्वास्थ्य'' नावाचे मासिक २६ वर्षे चालविले. त्यांच्या हयातीनंतर आता लोकांना त्यांचे द्रष्टेपण कळले. त्यांच्या कार्यास लोकमान्यता, राजमान्यता मिळाली.

दुसरे चिरंजीव श्री. शंकरराव कर्वे. ते विद्वान, कर्तृत्वसंपन्न, रसिक-वृत्तीचे होते. त्यांचे आफ्रिकेत वास्तव्य होते. ते नावाजलेले डॉक्टर होते.

डॉ. दिनकरराव कर्वे फर्ग्युसन कॉलेजचे प्राचार्य, विद्वान अध्यापक, शिस्तप्रिय प्रशासक म्हणून मान्यता पावले. त्यांच्या पत्नी डॉ. इरावती कर्वे

यांना संशोधन कार्यात आंतरराष्ट्रीय कीर्ती लाभली, त्याचबरोबर त्यांचे ललित वाङ्मयही लोकप्रिय झाले.

सतत उद्योग, नियोजनबद्धता, सेवाभाव अशा गुणांनी संपन्न अशा भास्कररावांनी आणि कावेरीबाईंनी अण्णांच्या माघारी संस्थेचे अपत्यवत संगोपन केले.

मुले, नातवंडांचे संसार पाहिले. बाया तृप्त होती. शेवटच्या क्षणापर्यंत लोकांवर आपला भार न टाकता आपली इहलोकीची यात्रा संपावी अशी तिची इच्छा होती.

२९ नोव्हेंबर १९५० रोजी तिची प्राणज्योत मालवली. जन्मभर ज्या संस्थेसाठी ती झिजली तिच्याच कुशीत विसावली. तिथेच तिची बांधलेली समाधी तुलसी-वृंदावनाच्या रूपाने तिच्या स्मृती जागवित आहे. अण्णांच्या सुखदु:खाची साथीदार सत्तावन्न वर्षे त्यांना साथसंगत करणारी बाया गेली. पण अण्णांच्या मनात मात्र तिचे स्थान चिरंतन होते.

''माझा खाजगी व सार्वजनिक संसार अतिशय नेटका झाला याचे श्रेय माझी दिवंगत पत्नी आनंदीबाई हिला दिले पाहिजे. आजच्या माझ्या बहुमानात तिचा वाटा मोठा आहे.'' पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या उपस्थितीत अण्णांच्या शंभराव्या वाढदिवसाच्या सत्काराला उत्तर देताना त्यांनी काढलेले हे उद्गारच बायाच्या मोठेपणाची साक्ष देतात.



## ब्रह्मानंदे नाचत आला दिवस सोनियाचा, दिवस शताब्दीचा

१८ एप्रिल १९५८ या दिवसाची सर्व लोक आतुरतेने वाट पहात होते. या दिवशी अण्णांचा १०० वा वाढदिवस होता. हा समारंभ संपूर्ण देशभर उत्साहाने संपन्न झाला. सर्वांच्या आनंदाला उधाण आले होते. अण्णांच्या कार्यावर श्रद्धा ठेवणाऱ्या असंख्य व्यक्तींना, संस्थांना त्यांचा सत्कार करायचा होता. १८ एप्रिल पूर्वीच या सत्कारांना प्रारंभ झाला. १३ एप्रिल १९५८ रोजी अण्णांच्या कर्मभूमीत हिंगण्याच्या माळावर त्यांचा हृद्य सत्कार झाला. प्रसन्न वातावरणात हजारो लोकांच्या उपस्थितीत अनेकांच्या शुभेच्छांनी, भावपूर्ण भाषणांनी हिंगण्याचा परिसर भारावून गेला होता. रात्री हिराबाई बडोदेकरांचे सुश्राव्य गायन झाले. अलौकिक अनुभूतीच्या मानसिक समाधानाने लोक घरोघरी परतले.


चार दिवसांनंतर म्हणजे १८ एप्रिल १९५८ अण्णांच्या १०० व्या वाढदिवसानिमित्त ब्रेबॉन स्टेडियमवर त्यांचा भव्य सत्कार समारंभ संपन्न झाला. अध्यक्ष होते मुंबईचे राज्यपाल श्री. श्रीप्रकाश. या समारंभासाठी पं. जवाहरलाल नेहरू आवर्जून दिल्लीहून आले होते. त्यांचे भाषण जिव्हाळ्याचे, ओथंबलेले, हृदयस्पर्शी होते. आपल्या भाषणात ते म्हणाले, ''आजच्या सारखा अलौकिक प्रसंग यापूर्वी आला नाही, यापुढेही येईल असे वाटत नाही. मी येथे महर्षींचे अभिनंदन करण्यासाठी आलो नाही तर त्यांचे आशीर्वाद मागण्यासाठी आलो आहे. त्यांच्या आशीर्वादाने त्यांच्या अंगी असलेले त्याग, सेवावृत्ती, कार्यावरची निष्ठा, प्रसिद्धी विन्मुखता, सत्चरित्र इ. अनमोल गुण आमच्यात यावे अशी माझी इच्छा आहे.'' या महोत्सवाबद्दल सर्वांचे आभार मानून अण्णा म्हणाले, ''माझ्या हातून जे कार्य घडलेले दिसते त्या सर्वांचे श्रेय माझ्या सहकाऱ्यांनी व जनतेने सढळ हाताने दिलेल्या मदतीला आहे. हा गौरव खरं म्हणजे त्यांचा आहे. मी त्यांचा प्रतिनिधी म्हणून त्याचा स्वीकार करतो आहे. देवाने





१९५५ साली भारत सरकारने अण्णांना पद्मविभूषण पदक देऊन त्यांचा गौरव केला.

१८ एप्रिल, १९५८ रोजी अण्णांच्या वयाला १०० वर्षे पूर्ण झाली. त्यानिमित्त कर्वेनगर व मुंबई येथे शताब्दी महोत्सव अत्यंत उत्साहाने साजरा करण्यात आला. त्याचवेळी त्यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी भारत सरकारने स्वतंत्र पोस्टाचे तिकीट काढले व भारतातील सर्वोच्च मानाची "भारतरत्न" पदवी त्यांना बहाल करण्यांत आली. लोकमान्यतेबरोबरच राजमान्यता मिळाली.








माझ्यावर कृपादृष्टी ठेवली. माझा खाजगी संसार व सार्वजनिक संसार अतिशय नेटका झाला याचे श्रेय माझ्या दिवंगत पत्नीला दिले पाहिजे. आजच्या बहुमानात तिचा मोलाचा वाटा आहे. माझ्या सर्व इच्छा पूर्ण झाल्या आहेत. आता शेवटची इच्छा राहिली आहे." अण्णांचे हे वाक्य ऐकून श्रोत्यांची उत्सुकता वाढली. अण्णा पुढे म्हणाले, "इतर राज्या प्रमाणे महाराष्ट्र व गुजरात ही दोन राज्ये स्वतंत्र व्हावीत." टाळ्यांच्या प्रचंड कडकडाटात श्रोत्यांनी महाराष्ट्राचा जयजयकार केला. अण्णा तसे अबोल, राजकारणात लक्ष न घालणारे, त्यांनी स्पष्ट शब्दात नेहरूंच्या उपस्थितीत ही मागणी करावी याचे लोकांना आश्चर्य वाटले. लोकांना वाटले अखेरच्या आयुष्यात अण्णा आता राजकारणात कशाला शिरले. परंतु असंख्य लोकांनी भेटून या इच्छेचे कौतुकही केले व अभिनंदनही केले. लवकरच त्यांची तीही इच्छा पूर्ण झाली.

शताब्दी निमित्त अण्णांचे ठिकठिकाणी सत्कार झाले. १८९९ साली अण्णांनी आपला ५ हजार रुपयांचा विमा अनाथ बालिकाश्रम संस्थेला बेचन करून दिला होता. विम्याची रक्कम अण्णांच्या पश्चात संस्थेला मिळायची होती. परंतु शताब्दीच्या निमित्ताने लाईफ इन्शुरन्स कंपनीने ही विम्याची रक्कम १८ एप्रिल १९५८ रोजीच संस्थेला दिली. कर्वे यांच्याबद्दल भारत सरकारनेही कृतज्ञता व्यक्त केली. २६ जानेवारी १९५८ रोजी "भारतरत्न" ही सर्वोच्च पदवी त्यांना दिल्याचे जाहीर करण्यात आले.

१८ एप्रिल १९५८ रोजी त्यांची प्रतिमा असलेले पोस्टाचे तिकिट प्रसिद्ध करण्यात आले. "डॉ. कर्वे यांची कथा" हा लघुपट १८ एप्रिल १९५८ रोजी भारतातील मुख्य चित्रपटगृहातून दाखविण्यात आला. संस्थेनेही १९५८ साली अण्णांच्या जन्मशताब्दी निमित्त गरीब, गरजू, निराधार अशा स्त्रियांना स्वावलंबी बनविण्यासाठी "उद्यम मंडळ" ची स्थापना केली.

७ मे १९५८ रोजी अण्णा आपल्या जन्मगावी जायला निघाले. सकाळी वाईच्या लोकांनी त्यांचा सत्कार केला. संध्याकाळी दापोली हायस्कूलमध्ये सत्कार झाला. मुरुड येथे तीन दिवस भरगच्च कार्यक्रम आयोजित केले होते. या समारंभासाठी मुरुडकर मंडळी वर्षभर झटत होती. मुरुड माणसांनी फुलून गेले होते. अतिशय हृद्य व भावपूर्ण असा हा समारंभ झाला. पुनर्विवाहानंतर ज्या मुरुड गावाने त्यांच्यावर बहिष्कार टाकला होता, त्यांचा धिक्कार केला होता, तिथेच सत्काराचे हार त्यांच्या गळ्यात पडत होते. विधवांच्या उद्धारासाठी झटणाऱ्या अण्णांना जिथे शिव्या ऐकाव्या लागल्या होत्या तिथे त्यांच्या ओव्या गायल्या जात होत्या. ज्या दुर्गादेवीच्या मंदिरात जायला अण्णांना बंदी होती त्याच मंदिराच्या प्रांगणात अण्णांचा पुतळा बसविण्यात आला. तिथल्या रस्त्यालाही अण्णांचे नाव देण्यात आले. आतापर्यंत झालेल्या अन्यायाचे परिमार्जन होत होते.

६५ (पासष्ट) वर्षांपूर्वी मुरुडमध्ये झालेल्या विरोधामुळे, निंदेमुळे अण्णा जसे होरपळून गेले नाहीत तसेच या सत्कार समारंभाच्या स्तुतीने ते हुरळूनही गेले नाहीत. अण्णा आत्मतृप्त होते. शांत होते.

## असे होते महर्षी

महर्षी अण्णासाहेब कर्वे म्हणजे महाराष्ट्राच्या शैक्षणिक, सामाजिक इतिहासाच्या एका क्रांतिकारक शतकाचे मूर्तिमंत साक्षीदार. समाजाने, परिस्थितीने, निसर्गाने प्रारंभी त्यांच्या मार्गात अडथळे निर्माण केले. मात्र आपल्या दृढनिश्चयाच्या बळावर, शुद्ध चारित्र्याच्या आधारावर त्यांनी साऱ्या संकटांवर धैर्याने मात केली.

स्त्री शिक्षणाच्या कार्याला अण्णांनी प्रारंभ केला. त्या वेळी धोंडो केशव कर्वे म्हणजे कोकणातला एक भित्रा, भिडस्त, अशक्त, पैसा-अडका नसलेला तरुण अशी त्यांची प्रतिमा होती. जीवनाच्या



संध्याकाळात, स्त्री जातीच्या उद्धारासाठी आयुष्याचा होम प्रज्वलित करून राक्षसी रूढींना मूठमाती देण्यासाठी भगीरथ प्रयत्न करणारे कर्मयोगी म्हणून ते मान्यता पावले.

अण्णांचे आयुष्य सर्वस्वी एका ध्येयाला वाहिलेले होते. राजकारण, समाजकारण, साहित्य इ. विषयांवर अनेक वादंग माजत पण अण्णा इतर कोणत्याही गोष्टींबद्दल बोलत नसत. त्यांना जे कृतीत आणायचे असेल त्याबद्दल ते निर्भयपणे बोलत. काम ज्या व्यक्तीपाशी असेल तीच व्यक्ती त्यांना दिसे. त्यांचे बोलणेसुद्धा मोजके, कामापुरतेच असे. गप्पा मारणे हे त्यांना ठाऊक नव्हते. ते भाषणे करीत. मात्र त्या त्या वेळी ते जे काम करीत असतील फक्त त्याच संबंधात बोलत.

प्रभावी वाणीने व्यासपीठे गाजविणे, चुरचुरीत किंवा विद्वत्तापूर्ण लेखांनी वाचकांची मने जिंकणे, राजकीय प्रश्नांवर चळवळी उभारणे, तुरुंगात जाणे या कारणांमुळे माणसे प्रसिद्धीच्या झोतात येतात. अण्णांनी यापैकी कोणतीही गोष्ट केली नाही तरीही ते महर्षी झाले.

विचार, उच्चार, आचार यातील एकवाक्यता, विचारपूर्वक हाती घेतलेले कार्य तडीस नेण्याची जिद्द, जबरदस्त ध्येयनिष्ठा, कठोर परिश्रम, त्याग करण्याची तयारी या त्यांच्या सद्‌गुणातच त्यांच्या यशाचे रहस्य सामावले आहे.

कार्याच्या तळमळीमुळे एखादा सामान्य दिसणारा माणूस असामान्य कामगिरी कशी गाजवू शकतो याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे ''महर्षी कर्वे.'' कठोर संयम, अबोल, अलिप्तपणा, प्राप्त परिस्थितीशी झटकन समरस होणे, त्यात स्वतःला सामावून घेणे या वृत्तीमुळे अण्णा समाजात कधी एकटे पडले नाहीत.

अण्णांची प्रचारपद्धती कष्टाची, दगदगीची असली तरी त्यांचा प्रचार प्रत्यक्षपणे म्हणजे माणसांच्या गाठीभेटी घेऊन, त्यांच्याशी बोलून, त्यांची समजूत घालून, सहानुभूती मिळवून होत असल्याने देणाऱ्यास संस्थेबद्दल आपलेपणा वाटे.

कै. तात्यासाहेब केळकर अण्णांच्या दातृत्वाचा गौरव करताना म्हणतात, "अण्णांनी याचकाचा पेशा पत्करला. तरी वृत्तीने ते याचक कधीही बनले नाहीत. योग्य वेळी त्यांचे दातृत्व उचंबळून आल्याशिवाय राहत नसे. त्यांनी स्वतः सुरू केलेल्या संस्थांना देणग्या दिल्याच, शिवाय कोठेही कसलेही त्यागपूर्वक काम अण्णांना दिसले की त्यांचा हात स्वतःच्या खिशाकडे वळल्यावाचून राहत नाही." अण्णांच्या कार्यतत्परतेविषयी, चोखपणाविषयी केळकर पुढे म्हणतात, "केलेल्या कार्याची खडान् खडा नोंद, मिळविलेल्या पैशांचा पै न पै चा हिशेब अण्णांनी जितक्या चोखंदळपणाने ठेवला तितका महाराष्ट्रात काय पण सबंध हिंदुस्थानात कोणी ठेवला असेल असे वाटत नाही."

महर्षी कर्वे यांच्या कार्यकर्तृत्वाचा गौरव करताना महात्मा गांधीजी आपल्या यंग इंडिया या पत्रात म्हणतात, "प्रो. कर्वे यांची कर्तव्यनिष्ठा, त्यांचा अश्रांत उत्साह, कोणत्याही परिस्थितीत त्यांनी सांभाळलेली सचोटी, विरोधी वातावरणात टिकवून ठेवलेली श्रद्धा, अदम्य आशावाद ही राष्ट्राची पहिल्या प्रतीची पुंजी आहे."



## अण्णांचा स्वभाव - अण्णांच्या शब्दात

अण्णांच्या लोकोत्तर, असामान्य कार्याची, सद्‌गुणांची थोरामोठ्यांनी मुक्त कंठाने प्रशंसा केली तरी अण्णांना स्वतःच्या गुणदोषांची पूर्ण कल्पना होती. त्यांनी आपल्या आत्मचरित्रात प्रांजलपणे त्याचा उल्लेख केला आहे. ते म्हणतात...

माझा स्वभाव मूळचा रागीट पण मी भिडस्त, भित्रा असल्याने माझ्या रागापासून दुसऱ्यांना त्रास होत नसे.

स्वतःच्या व संस्थेच्या संसारात येणाऱ्या अडचणींनी मी हताश होऊन जात नाही. आनंदाच्या प्रसंगी माझे मन फार हलके होते. कित्येक वेळा गहिवर येऊन आनंदाश्रू आवरेनासे होतात. मात्र दुःखाच्या अगर संकटाच्या प्रसंगी माझे मन अतिशय कठोर बनते, अशा वेळी दुःखाश्रू न येता उलट प्रसंगाला तोंड देण्यासाठी एक प्रकारचे स्फुरण अंगात चढते.

एखादी गोष्ट मला पटली, बरी वाटली, ती मी हाती घेतली, म्हणजे दुसऱ्यांच्या बऱ्या वाईट म्हणण्याकडे लक्ष न देता, होता होईल तो तिच्यापासून माघार घ्यायची नाही असा माझा स्वभाव असल्याने कधी कधी त्याला हट्टीपणाचे स्वरूप येते.

दोषांवर पांघरूण घालण्याचा एक लहानसा गुण माझ्यात आहे. एवढीच त्यातल्या त्यात समाधानाची गोष्ट आहे.

दुसऱ्याला नाखुष करणे माझ्या अगदी जीवावर येते. या दोषामुळे दुसऱ्याचे अपराध पोटात घातले जातात. त्यामुळे अपराध्यास योग्य शासन होत नाही. त्यामुळे शिस्त राखण्याच्या कामी माझ्याकडून ढिलाई होते. आपल्याबद्दल कोणाचा गैरसमज झालेला असेल तर योग्य वेळ साधून, युक्ती प्रयुक्तीने आपली बाजू मांडून तो दूर करण्याचे चातुर्य मजजवळ नसल्याने स्वस्थ बसावे लागते. त्यामुळे कधी कधी गैरसमज वाढत जातात.

ज्या वेळी जे कार्य हाती घेतले असेल त्या वेळी सर्व लक्ष त्या कार्याकडे लावून ते चिकाटीने करीत राहावे असे मी करीत आलो आहे.

कोणतीही नवीन कल्पना निघाली की, तिच्याबद्दल अनुकूल, प्रतिकूल विचार प्रकट व्हायचेच. अनुकूल अभिप्रायांनी हुरळून न जाता प्रतिकूल अभिप्रायांनी हताश न होता मी समतोल वृत्तीने माझे काम चालू ठेवीत असे.

जेथे आपले समर्थन करण्यासाठी दुसऱ्याचा दोष अगर कमीपणा दाखविण्याशिवाय गत्यंतर नसते, अशावेळी आपणच कमीपणा पत्करून स्वस्थ बसणे मला बरे वाटते.

आपले विचार दुसऱ्यांस पटतील अशा रीतीने त्यांच्यापुढे मांडणे व माणसाची समजूत घालून सलोखा उत्पन्न करणे हे दुर्दैवाने माझ्यात नसल्याने इतरांची समजूत न पटणे हे काळावर सोपवून मी हाती घेतलेल्या कामात स्वतःला गुंतवून ठेवतो.

मी विशेष आसक्तीने संसार कधीच केला नाही. जेव्हा जेव्हा सार्वजनिक कामात मी फार गढून गेलो तेव्हा तेव्हा सांसारिक सुखाचा मला विसर पडायचा.

आपण गोडधोड खावे, उत्तम घरात राहावे, उत्कृष्ट पोषाख करावा आणि चैनीने सुख भोगावे अशा कल्पना मला अगर आनंदीबाईला कधी शिवल्या नाहीत. राधाबाईशी संसार करताना तिच्याही मनात आल्या नाहीत. निसर्गाच्या शाळेत आम्हाला उत्कृष्ट शिक्षण मिळून उद्योगात वेळ घालवणे आपल्या अंगवळणी पडले होते.

करमणुकीच्या मार्गाकडे माझे मन कधी फारसे वळले नाही. मी तेरा वर्षे मुंबईत काढली, तेवढ्या मुदतीत मी एकच नाटक पाहिले ते 'संगीत शाकुंतल.' पुण्यातील आयुष्यक्रमातही एकच नाटक पाहिले ते म्हणजे 'मतिविकार' ते सुद्धा पुनर्विवाहाच्या विषयावर लिहिलेले असल्यामुळे पाहिले. सर्कशीचा खेळ मी एकदाच पाहिला, तेही आश्रमातील मुलींना दाखविण्याच्या निमित्ताने.



पुष्कळ वर्षे स्त्रियांच्या सहवासात राहून त्यांच्या उन्नतीचा विचार करता करता त्यांचा भाविकपणा, हा गुण मी उचलला आहे. भक्तीने देवावर तीळ, तांदूळ, फुले यांची लाखोली वाहावी किंवा देवाला, वडा पिंपळाला लक्ष प्रदक्षिणा घालाव्यात यात भाविक स्त्रिया आपला बराच वेळ घालवितात. त्यांचे अनुकरण मी माझा वेळ सरस्वती देवीवर, महिला विद्यापीठावर वर्गणीची लाखोली वाहण्याचा संकल्प करून त्या कामी खर्च करीत असे. आणा, अर्धा आणा वर्गणी देऊन वर्गणीदारांची संख्या एक लक्ष करण्यास मला मदत करा असे मी व्याख्यानात कित्येक वेळा सांगत असे.

स्वतंत्र विचार न करता आपोआप बनलेल्या पापपुण्याविषयीच्या व ईश्वराविषयीच्या माझ्या कल्पना जसजसा स्वतंत्र विचारांचा उदय होऊ लागला तसतशा लयाला जाऊ लागल्या. आपल्याला समजतील व पटतील अशी सत्पुरुषांच्या तोंडची वचने वाचावीत, त्यांचे मनन करावे आणि कालांतराने सद्‌विचार कृतीत उतरविण्याचा प्रयत्न करावा एवढेच माझे धर्माचरण बनले.

- ★ मना चंदनाचे परी त्वा झिजावे, परी अंतरी सज्जना निववावे.
- ★ मना श्रेष्ठ धारिष्ट जीवी धरावे, मना बोलणे नीच सोशीत जावे.
- ★ असे हो जया अंतरी भाव जैसा, वसे हो तया अंतरी देव तैसा.
- ★ बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले.

अशा सत्प्रवृत्ती निर्माण करणाऱ्या सत्पुरुषांच्या वाणीतून निघालेल्या पद्यपंक्ती मला विशेष आवडत असत.

कधी कधी मरणाविषयी विचार करून त्या विषयीची भीती नाहीशी करणे जरुरीचे असते. जन्माला आलेल्या व्यक्तींना संस्थांना मरण हे आहेच. अशा आपत्तीच्या प्रसंगी मी आपले मन घट्ट करून ठेवीत असे. मरण ही व्यवहारात नित्य घडून येणारी गोष्ट आहे. तिच्याबद्दल विचार करून 'आपुले मरण पाहिले म्या डोळा तो झाला सोहळा अनुपम' अशी मनःस्थिती अल्पांशाने अनुभविण्याचा मी कधी कधी प्रयत्न करीत असे.

## महर्षींचे महानिर्वाण


"मी अत्यंत सुखी आहे. मला शक्य होते ते सारे मी केले. केवळ विधवांसाठीच नव्हे तर हरिजनांसाठीही मी शक्य तितका झटलो. जात-पात तोडक मंडळाचेही कार्य केले. इच्छा तेथे मार्ग हे माझे सूत्र. नवा मार्ग काढण्यावर माझ्या मनाचा सदा भर. जीवनाचे नवेनवे मार्ग मी शोधीत गेलो, म्हणूनच मला माझ्या जीवनात आनंद लुटता आला."

वयाची शंभरी ओलांडून गेल्यावर अण्णासाहेब कर्वे यांनी काढलेले हे कृतार्थतेचे उद्‌गार. अण्णा खरोखरच भाग्यवान. त्यांना १०४ वर्षांचे दीर्घायुष्य लाभले. आपल्या प्रदीर्घ आयुष्याचा कण अन् कण त्यांनी समाजसेवेसाठी, समाजसुधारणेसाठी वेचला. त्यांचे भांडण होते राक्षसी रूढींशी, ते त्यांनी अखेरपर्यंत जिद्दीने, सातत्याने चालूच ठेवले होते.

आपल्या हाताने लावलेले समाजकार्याचे, स्त्री-शिक्षणाचे लहानसे रोपटे फळाफुलांनी डवरलेले त्यांनी आपल्या हयातीत पाहिले. त्यांच्या कार्याला लोकमान्यता मिळाली, राजमान्यताही मिळाली.

बनारस, पुणे, महिला विद्यापीठ, मुंबई यांनी डी.लिट. पदवी देऊन त्यांच्या कार्याचा गौरव केला. मुंबई विद्यापीठाने एलएल. डी. ही पदवी देऊन त्यांचा सन्मान केला. त्यांच्या समाजकार्याबद्दल "पद्‌मविभूषण" ही पदवी देऊन शासनानेही त्यांचा सत्कार केला. त्यांच्या शंभरीच्या निमित्ताने "भारतरत्न" हा सर्वोच्च बहुमान देऊन राष्ट्रपतींनी त्यांचा सन्मान केला.

अण्णा स्थितप्रज्ञ वृत्तीने हे सारे पहात होते. त्यांची एकच इच्छा होती, आता सुखाने मरण यावे. ते नेहमी म्हणत, 'अनायासेन मरणं विना दैन्येन जीवनं' त्यांचे जीवन कृतार्थ झाले होते. धन्य झाले होते. अशा तृप्त, समाधानी अवस्थेत असतानाच त्यांनी अत्यंत शांतपणे, समाधानाने या जगाचा निरोप घेतला. आपली इहलोकीची यात्रा संपविली. तो दिवस



होता ९ नोव्हेंबर १९६२. त्यांच्या निधनाने समाजकार्याचे एक पर्व समाप्त झाले. स्त्रियांच्या उद्धारासाठी अखंड धडपडणारा असामान्य महर्षी हरपला. महाराष्ट्राच्या मोठेपणाची चालती-बोलती निशाणी काळाच्या पडद्याआड गेली. एका युगपुरुषाचे महानिर्वाण झाले. स्त्रियांचे कैवारी, करुणेचे सागर, संत, सुधारक, सेवामूर्ती, अगणित कन्यांचे धर्मपिता असणाऱ्या अण्णांनी सर्वांचा कायमचा निरोप घेतला.

अण्णांचा मरणसोहळा सुद्धा भव्य समारंभासारखा झाला. पुण्यातूनच नव्हे तर अवघ्या महाराष्ट्रातून लोक त्यांच्या अंत्यदर्शनाला आले होते. भारताचे राष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन, उपराष्ट्रपती डॉ. झाकीर हुसेन, डॉ. राजेंद्र प्रसाद, पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी पाठविलेले संदेश वाचून दाखविण्यात आले. रँग्लर र. पु. परांजपे, लेडी प्रेमलीला ठाकरसी, महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार, आचार्य अत्रे, एस. एम. जोशी अशा मान्यवरांची, अण्णांच्या लोकोत्तर कार्याचे वर्णन करणारी भावपूर्ण भाषणे झाली. अण्णांच्या विद्यार्थिनींनी व संस्थेच्या सर्व सेवकांनी अश्रुपूर्ण नेत्रांनी अण्णांचे अंत्यदर्शन घेऊन त्यांना श्रद्धांजली वाहिली. अण्णांच्या पत्नी आनंदीबाई कर्वे म्हणजे ''बाया'' यांच्या समाधी शेजारीच त्यांची समाधी बांधली गेली. त्यांचा पुतळाही उभारला गेला. आजही या समाधीचे दर्शन कार्यकर्त्यांना समाजसेवेची प्रेरणा देते.

ज्या हिंगण्याच्या माळावर अण्णांनी स्त्री-शिक्षणाचे बीज पेरले, तेथे ते रुजले आणि अंकुरितही झाले. या त्यांच्या कर्मभूमीतच त्यांचे जीवन घडले आणि मृत्यू आला तोही याच भूमीच्या कुशीत. अण्णांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या या हिंगण्याचे नाव त्याच्या निधनानंतर कर्वेनगर असे ठेवण्यात आले. त्यांची स्मृती चिरंतन रहावी या उद्देशाने समाजकार्याचे प्रशिक्षण देणारी, स्त्रियांच्या प्रश्नांचा अभ्यास करणारी कर्वे समाजसेवा संस्था उभारण्यात आली.



गुलटेकडी जवळच्या वसाहतीला महर्षी कर्वे यांच्या स्मरणार्थ महर्षिनगर यांचे नाव देण्यात आले. पुण्यातील एस. एन. डी. टी. च्या परिसराला दिलेले कर्वे विद्याविहार, कर्वे रोडवरील महर्षी कर्वे दूरध्वनी केंद्र ही देखील अण्णांच्या कार्याची स्मृती जागविणारी स्मारके होत.

१९९४ मध्ये पुणे महानगरपालिकेच्या सहकार्यामुळे कोथरूड येथे महर्षी कर्वे यांचा पूर्णाकृती पुतळा उभारला गेला. राष्ट्रपती शंकर दयाळ शर्मा यांच्या हस्ते त्याचे अनावरण झाले.

आता तर हिंगणे स्त्री-शिक्षण संस्थेचे नावही ''महर्षी कर्वे स्त्री-शिक्षण संस्था'' असे झाले आहे.

ही सर्व स्मारके अण्णांच्या कार्याची स्मृती चिरंतन करणारी, समाज कार्याची प्रेरणा, स्फूर्ती देणारी केंद्रे आहेत.

## तयाचा वेलु गेला गगनावरी

महर्षी कर्वे म्हणायचे, ''शिक्षणामुळे स्त्री स्वतंत्र व कर्तव्यदक्ष बनेल. आशा-आकांक्षांचे अमर्याद क्षेत्र स्त्रियांना शिक्षणामुळे मोकळे होईल. शिक्षणामुळे ती अधिक समर्थ बनेल.''

अण्णांची ही अपेक्षा आज बऱ्याच अंशी पूर्ण झाली आहे.

आज मुलींच्या शेकडो, हजारो शाळा निघाल्या आहेत. त्यात लक्षावधी मुली शिकत आहेत. शंभर वर्षापूर्वीची दुर्बल, परतंत्र, चार भिंतीत कोंडलेली अशी स्त्रीची प्रतिमा आता राहिलेली नाही. ती आता मुक्त झालेली आहे. शिक्षणाची सर्व दालने तिला खुली झाली आहेत. ती आता प्रशासक, पोलिस महासंचालक, पायलट, मंत्री, पंतप्रधानही बनू शकते. बुद्धिमान, समर्थ स्त्रीला कर्तबगारीच्या शेकडो वाटा आता खुल्या झाल्या आहेत. ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान, कला, क्रीडा, अभिनय अशा विविध क्षेत्रांत ती आपली गुणवत्ता सिद्ध करीत आहे. हे परिवर्तन घडवून

आणण्यात महर्षी कर्वे यांचा सिंहाचा वाटा आहे.

महर्षी कर्वे यांनी शंभर वर्षांपूर्वी स्थापन केलेली "अनाथ बालिकाश्रम" ही संस्था आता अनाथ बालिकाश्रम नव्हे तर "महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था" या सार्थ नावाने अभिमानास्पद कार्य करीत आहे. स्त्रियांवरील अन्याय, कालबाह्य रूढी, सामाजिक विषमतेविरुद्ध ठोस उपाययोजना करणारी भारतातील आद्य संस्था, अण्णांचेच समाजसेवेचे, स्त्री-शिक्षणाचे कार्य नेटाने करीत आहे. स्त्रीची अस्मिता जागविण्यासाठी स्त्री-शिक्षणाचा पुरस्कार, प्रचार, प्रत्यक्ष आचार करण्यासाठी कटिबद्ध आहे.

या संस्थेचे कार्य आता स्त्री-शिक्षणापुरते मर्यादित राहिलेले नाही. सामाजिक बांधिलकीचे भान ठेवून संस्थेने महिलांच्या विकासाचे अनेक प्रकल्प कार्यान्वित केले आहेत.

काळाची गरज ओळखून सुशिक्षणाबरोबरच मुलींना स्वावलंबी बनविण्याच्या दृष्टीने तंत्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध करून दिलेली आहे.

भारतातील मुलींचे पहिले अभियांत्रिकी महाविद्यालय तसेच भारतातील मुलींचे पहिले वास्तुशास्त्र महाविद्यालय सुरू करून संस्थेने गरुडझेप घेतली आहे.

अण्णांचा १०० वा वाढदिवस जसा उदंड उत्साहाने संपन्न झाला तसाच त्यांनी स्थापन केलेल्या संस्थेचा शतकमहोत्सवाचा सोहळा मान्यवरांच्या तसेच हजारो विद्यार्थिनी, हितचिंतकांच्या उपस्थितीत अपूर्व उत्साहाने संपन्न झाला. तो दिवस होता १४ जून १९९६. या दिवशी संस्थेने १०० व्या वर्षांत पदार्पण केले. या शताब्दी समारंभाच्या सोहळ्यात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री ना. मनोहर जोशी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना म्हणाले, "प्रत्येक स्त्रीने परमेश्वराबरोबर महर्षी कर्वे यांना वंदन करावे एवढे त्यांचे स्थान मोठे आहे. कर्वे यांना "भारतरत्न" किताब



देऊन सरकारने त्यांचा गौरव केलेला नसून कर्वे यांनी भारतरत्न पुरस्कार स्वीकारून त्या पुरस्काराचा गौरव केला आहे.

त्याग आणि कष्टाच्या पायावर उभ्या राहणाऱ्या संस्था समाजाला दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शन करू शकतात हेच या संस्थेने दाखवून दिलेले आहे."

या समारंभाचे अध्यक्ष विधानपरिषदेचे सभापती मा. श्री. जयंतराव टिळक आपल्या भाषणात म्हणाले, "लोकमान्य कर्मयोगी होते, तर महर्षी कर्वे समयोगी होते. त्यांनी समानतेचा ध्यास घेतला होता. स्त्री-पुरुष, जाती-जमाती, सुख-दुःख यांतील भेदाभेदांवर मात करण्याचा त्यांचा संकल्प होता, निर्धार होता. तो त्यांनी अखेरपर्यंत कायम ठेवला."

**असे होते महर्षी कर्वे - असे होते त्यांचे लोकोत्तर कार्य**

## महर्षींचे विचार धन

* सार्वजनिक उद्योग हाती घेणाऱ्या मनुष्याचे मन थोर असले पाहिजे. स्वतःच्या संस्थेवर विशेष प्रेम असणे, तिच्यासाठी रात्रंदिवस घडपडणे जरूर आहे, हे खरे आहे तथापि अशा मनुष्यांच्या मनात मनुष्यजातीच्या व समाजाच्या प्रगतीसाठी जी माणसे, ज्या संस्था झटत आहेत त्यांच्याबद्दल प्रेमभाव व सहानुभूती असणे अत्यंत आवश्यक आहे.

* मतभेद हे सर्वत्र असावयाचेच. पण त्याच्या मुळाशी व्यक्तिविषयक भावना नसून राष्ट्रीय भावना असली पाहिजे म्हणजे ते सद्बुद्धीने चाललेल्या कार्याच्या आड येत नाहीत.

* जसजसे मनुष्य आत्मपरीक्षण, आत्मसंशोधन करू लागेल तसतसा त्याचा आत्मोन्नतीचा मार्ग अधिकाधिक सुलभ होत जाईल.

* मनुष्य अस्तिक असो नास्तिक असो. त्याचे या जगातील जीवित एक अलौकिक चीज आहे. तिचा उपयोग फार दूरदर्शीपणाने, शहाणपणाने केला पाहिजे.

* आत्मोन्नतीसाठी तळमळ उत्पन्न होणे हे मनुष्यपणाचे पहिले चिन्ह होय. पदोन्नतीच्या द्वारे आत्मोन्नती साधण्यासाठी धडपडणे ही त्यावरची पायरी होय.

* कोणत्याही कार्यावर निस्सिम प्रेम जडल्यावाचून मनुष्याच्या हातून समाधानकारक काम होत नाही.



* स्त्रियांमध्ये शिक्षणाचा प्रसार करणे हे अत्यंत पवित्र असे देशकार्य-धर्मकार्य आहे. या कार्यासाठी केलेले विचार, आचार, उच्चार हीच परमेश्वराची प्रार्थना, हेच जन्माचे सार्थक अशी आपली वृत्ती असली पाहिजे.

* स्त्री शिक्षणाच्या कार्याची लांबी, रुंदी, खोली वाढविण्याच्या महत्कार्यासाठी मी आपले जीवित अर्पण करीन अशी मनाची तयारी असली पाहिजे.

* आपण दीर्घायुषी होण्याचा जसा प्रयत्न करीत असतो तसा आपल्या संस्था दीर्घायुषी करण्याचा प्रयत्न आपण करावा.

* संस्था अल्पायुषी होण्याची जी कारणे आहेत त्यापैकी जमाखर्चाची अव्यवस्था व पैशाची अफरातफर हे आहे.

* अडचणीचे प्रसंग हे मनुष्याचे खरे शिक्षक होत.

* मनुष्याची किंमत त्याच्या मतावर नाही तर त्याच्या आचरणावर आहे.

* ऐहिक, पारलौकिक स्वार्थापलिकडे काहीही नाही, असे विचार मनुष्य फार काळ करीत राहिला तर त्याच्या मनाला समाधान मिळणार नाही. मी काय केले असता माझ्या जन्माचे सार्थक होईल हा विचार मनुष्याच्या श्रेष्ठ मनोवृत्तीचा दर्शक आहे.

* आपणाला कोणी शत्रू उत्पन्न होऊ द्यायचा नाही हे करणे जसे अशक्य कोटीतले आहे तसेच आपण कोणाचे शत्रुत्व करायचे नाही हे करणे नाही. अर्थात तुलनेच्या दृष्टीने दुसरे पहिल्यापेक्षा सोपे इतकेच.

* जुने जसेच्या तसे सांभाळून ठेवण्यात अर्थ नाही, शहाणप्रणा नाही. जुन्या-नव्यांचा एकजीव होऊन जुन्यातून नवे उत्क्रांत होणे हीच जुन्याची खरी वाढ होय.

* राष्ट्रीय ग्रंथ, राष्ट्रीय पुरुष, राष्ट्रीय परंपरा ही सर्व राष्ट्रीय जीव- होत.

* चांगले विचार फार काळ टिकत नाहीत. ते तीव्र असतानाच मनुष्याने चांगले कार्य उरकून घ्यावे.

●●●